■ RNI NO. MAHMAR/2020/79996 नवे विचार...नवी सुरुवात ■ Postal Reg. No. SGL/135/2025-2027

दैनिक

# हॅलो प्रभात


■ मुख्य संपादक : **गणेश पाटील** (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : ७० ■ शुक्रवार, १३ जून २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




# अहमदाबादमध्ये विमान कोसळून मोठी दुर्घटना

## गुजरातचे माजी मुख्यमंत्री रुपानी यांच्यासह 241 प्रवाशांचा मृत्यू



**अहमदाबाद : वृत्तसेवा**

**गुजरातमधील अहमदाबाद येथे एअर इंडियाचे प्रवासी विमान काल (१२ जून) आज दुपारच्या सुमारास कोसळून भीषण अपघात झाला. एअर इंडियाच्या बोइंग ७८७ या प्रवासी विमानातून क्रू मेंबर्ससह २४२ प्रवासी प्रवास करत होते. या प्रवाशांमध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपानी हेही पत्नीला परत आणण्यासाठी निघाल्याने याच विमानातून प्रवास करत होते. मात्र विजय रुपानी यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याची माहिती महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. तसेच विमानातील २४२ पैकी २४१ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून अहमदाबाद विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर काही वेळातच जवळच्या डॉक्टरांच्या वसतिगृहात धडकलेल्या या विमानाच्या भीषण अपघातात सीट ११ ए वर रमेश विश्वकुमार हा दैव बलवत्तर म्हणून जिवंत सापडला असल्याचे अहमदाबाद पोलीस आयुक्त जीएस मलिक यांनी सांगितले.**

दरम्यान, एकनाथ शिंदे यांनी माध्यमांशी संवाद साधताना गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपानी यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे. त्यांनी म्हटले की, माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी या विमानून प्रवास करत होते, त्यांचाही मृत्यू झाला आहे. मी या दुर्घटनेबाबत खेद व्यक्त करतो. तसेच गुजरातमधील विमान दुर्घटनेत महाराष्ट्रातील काही लोकांचा समावेश आहे. या दुर्घटनेची देशाचे पंतप्रधान यांनीही गंभीर दखल घेतली आहे. पंतप्रधान मोदींसह केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हेही गुजरातसाठी रवाना झाले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, एअर इंडियाचे बी ७८७ ड्रीमलायनर विमान अख १७१ हे विमान अहमदाबादहून लंडनला निघाले होते. उड्डाण केल्यानंतर अवघ्या काही मिनिटांमध्येच मेघानी परिसरात एअर इंडियाचे हे विमान कोसळले.

मिळालेल्या माहितीनुसार, या विमानामध्ये २ पायलटसह १० क्रू मेंबर्स होते. तर, २३२ प्रवासी होते. ज्यामध्ये २३० प्रौढ आणि २ लहान मुलांचा समावेश होता. एअर इंडियाच्याने विमानाने दुपारी १.३८ मिनिटांनी उड्डाण केले आणि अवघ्या काही सेंकदातच कोसळले. या अपघातात विमानातील सर्व प्रवाशांचा मृत्यू झाला आहे.

-(आधीचे वृत्त व आणखी छायाचित्रे पान ३ वर पहा)-

# मिरजकरांच्या चक्रव्यूहात महानगरपालिकेची सत्ता

## स्थानिक नेते आता बड्या पक्षांना हादरा देणार?



**सांगली : विशेष प्रतिनिधी**

महापालिका निवडणूक पार्श्वभूमीवर सांगली, मिरज आणि कुपवाड शहरांमध्ये रणधुमाळी माजली आहे. राजकारणाच्या तापलेल्या वातावरणात डाव प्रतिडावावर लक्ष लागून आहे. तथापि महापालिकेच्या सत्तेत २३ वॉर्ड असलेल्या मिरजेचा मोठा सहभाग असणार आहे. असे राजकीय जाणकारांमधून बोलले जात आहे.

७८ सदस्य असलेल्या सांगली महानगर-पालिकेसाठी मिरजेतूनच २३ सदस्य निवडून जातात. २०१८ साली झालेल्या सांगली महापालिका निवडणुकीत भाजपने मिरजेतील सहा प्रभाकांतील २३ जागांपैकी १२ जागांवर विजयाचा झेंडा रोवला, त्यावेळी एकसंघ असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसला ८ जागांवर तर काँग्रेसला केवळ तीन जागांवर विजय मिळविता आला. कुपवाड आणि आणि मिरज हद्दीत येत असलेल्या प्रभाग दोन मधील ईदगाह मतदारसंघात विजय मिळविण्यात काँग्रेसला यश आले. २०१८ च्या महापालिका निवडणूकवेळी एकसंघ राष्ट्रवादी होती, आता राष्ट्रवादी (अजितदादा) आणि जयंतराव पाटलांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी (शरद पवार पक्ष) अशा दोन राष्ट्रवादी मैदानात

उतरणार आहेत, भाजप, शिवसेना बरोबर असल्यामुळे अजितदादांच्या राष्ट्रवादीचे पारडे जड होणार आहे, त्यातच महायुतीने सांगली महापालिकेसाठी स्वबळावर लढण्याचा निर्णय घेतला तर या निर्णयाचा अजितदादांच्या राष्ट्रवादी काँग्रेसलाच अधिक फायदा होणार आहे.

२०१८ च्या निवडणुकीत भाजपने ३९ तर त्यांच्या मित्रपक्षांनी दोन जागांवर विजय मिळविला होता. अजितदादांची राष्ट्रवादी महायुतीत असल्याने आणि स्थानिक नेत्यांची भरणा मोहिम त्यांच्यात सुरू असल्याने जागावाटप कसे होणार? या प्रश्नाने भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांची डोकेदखी वाढणार आहे.

सांगली महापालिकेसाठी महायुतीतील घटक पक्षांमध्येच जीवघेणी चूरस आहे. तथापि या महापालिका निवडणुकीतील सत्तेचे भवितव्य मिरजकरांवरच अवलंबून असणार आहे. ७८ पैकी २३ नगरसेवक मिरजेतूनच जाणार असल्याने महापालिकेवर वर्चस्व कुणाचे राहणार या गहन प्रश्नाची सोडवणूक करण्याची जबाबदारी मिरजकरांवर येणार आहे. नेत्यांपुढे मात्र संभ्रम कायम आहे मदनभाऊ पाटील यांच्या पत्नी जयश्रीताई पाटील अजितदादांच्या राष्ट्रवादीच्या वाटेवर असल्या तरी अद्याप मुहर्त निघायचा आहे. अशी जिल्ह्यातील राजकीय परिस्थिती असली तरी जयश्रीताई पाटलांनी संकेत दिल्याप्रमाणे अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला तर मात्र महापालिका निवडणुकीत राष्ट्रवादीचे पारडे जड होणार आहे. महापालिकेच्या रिंगणात जनसुराज्य शक्ती पक्षानेदेखील उडी घेतली आहे. महापालिकेत अस्तित्व ठेवण्याचा जनसुराज्य पक्षाचे नेते समितदादा कदम यांचा प्रयत्न आहे. या पक्षात दाखल होणाऱ्यांची संख्यादेखील लक्षणीय आहे. महायुतीतून निवडणूक लढविताना जनसुराज्य पक्षालादेखील त्यांचा जागांचा वाटा द्यावाच लागणार आहे.

महापालिका निवडणुकीचे वातावरण सध्या विचित्र वळणावर आले आहे. परस्थीती पाहून आणि ताकद असेल तेथे मैत्रीपूर्ण लढतीचा पर्याय स्विकारला जाईल असा अंदाज राजकीय जाणकारांचा आहे.

## माळेगाव कारखाना निवडणुकीसाठी आता अजितदादा मैदानात

**पुणे : हॅलो प्रभात**

अजित पवारांच्या उमेदवारीने माळेगावची निवडणूक राज्यात चर्चेची ठरली आहे. अजित पवारांनी चक्क मबफ प्रवर्गातून अर्ज भरल्याने ही निवडणूक प्रतिष्ठेची झालीय.अजित पवार गटाच्या निळकंठेश्वर पॅनेलच्या उमेदवारांची यादी जाहीर करण्यात आलीय. या निमित्ताने राजकीय लढाईचा तिसरा 'अंक' सुरू झाल्याची चर्चा होते आहे.

## मतचोरीची चौकशी करा

**मुंबई : हॅलो प्रभात**

विधानसभा निवडणुकीतील मतचोरीची चौकशी करावी यासाठी काँग्रेस पक्षाने आजपासून राज्यभर मशाल मोर्चे काढण्याचे निश्चित केले होते. आज गडचिरोलीत प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या नेतृत्वाखाली मशाल मोर्चा व शेतकरी न्याय पदयात्रा काढण्यात आली.






# क्रांतिवीर बाबाराव सावरकरांचे हिंदुस्थानातील एकमेव स्मारक 'सांगली' नगरीत

**हॅलो प्रभात**


**राष्ट्रासाठी आपल्या प्राणांच्या 'अंतिम श्वासापर्यंत..' झटत राहणाऱ्या ज्या महान व्यक्ती होऊन गेल्या, त्यामध्ये क्रांतिवीर बाबाराव सावरकर यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. एक ओजस्वी आणि बाणेदार चारित्र्यवान व्यक्तिमत्त्व म्हणजे क्रांतिवीर बाबाराव सावरकर. त्यांनी दिलेल्या स्वातंत्र्यसंग्रामातील योगदानाविषयी...**

नाशिक जिल्ह्यातील भगूर गावी दि. १३ जून, १९७९ रोजी दामोदर आणि राधाबाई या सुशिक्षित दांपत्यापोटी बाबाराव उपाख्य गणेश दामोदर सावरकर यांचा जन्म सनातन वैदिक कुटुंबात झाला. बाबारावांना बालपणापासूनच प्रतिकूल परिस्थितीशी झगडावे लागले. वयाच्या चौथ्या वर्षापासून त्यांना वेगवेगळ्या रोगांचा सामना करावा लागला. त्यांना असंख्यवेळा विंचूने दंश केला, टायफॉईड झाला, तरी सर्व आजारांना ते पुरून उरले. यातच त्यांचे पितृछत्र हरपले. त्यानंतर घराची संपूर्ण जबाबदारी बाबारावांवर येऊन पडली. पण, बाबारावांनी कुटुंबाची सर्व जबाबदारी व्यवस्थित हाताळली. ते प्रत्येकाची काळजी घेत असत. त्यावेळी देशभक्तांनी एकत्र येऊन एक संस्था स्थापन केली व देशक्रांतीची सुरुवात झाली. त्यांचे महत्त्वाचे कार्य म्हणजे स्वातंत्र्यसंग्रामाचे 'अभिनव भारता'चे विश्व. दि. १ जानेवारी, १९०० रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर, बाबाराव सावरकर, रावजी कृष्ण पागे या सर्वांनी मिळून या कार्याला पाठिंबा दिला आणि 'अभिनव भारत' संघटनेची स्थापना झाली. सर्व तरुण मंडळी राष्ट्रभक्तीने प्रेरित झाली होती. त्यानंतर तात्याराव सावरकर लंडनला गेले व 'अभिनव भारता'चे संपूर्ण कार्य बाबारावांनी पुढे नेले. संघटनेची अखिल भारतीय धुरा बाबारावांनी सांभाळली. 'अभिनव भारत' संघटना बाबारावांनी घराघरात पोहोचवली. स्वातंत्र्यसंग्रामामध्ये आपले मोलाचे कार्य चोख बजावले. त्यानंतर दि. २८ फेब्रुवारी, १९०९ मध्ये त्यांनी सशस्त्र क्रांती केली, म्हणून त्यांना अटक करण्यात आली. कारण होते की, कवी गोविंदांच्या कविता बाबारावांनी प्रकाशित केल्या. यासाठी त्यांना जन्मठेप शिक्षा सुनावण्यात आली. १९१० मध्ये त्यांना अंदमानला पाठवण्यात आले. अंदमानमध्ये बाबारावांचा अमानुष छळ करण्यात आला. बाबारावांना सुनावलेल्या पहिल्यांदा काथ्या कुटायचे काम देण्यात आले. ते करत असताना त्यांच्या हातातून रक्त येई. पोटात कळा यायाच्या. काथ्या कुटताना पाठीचा कणा मोडून जायचा. त्यानंतर बाबारावांनी कोलू ओढण्याचे काम दिले. बाबारावांचे शरीर रोग जर्द झाले होते. खोकताना बाबांना धाप लागायची. जेवणदेखील जात नव्हते. दिलेले काम वेळेत पूर्ण झाले नाही, तर त्यांना मारण्याचा आदेश दिला जायचा. असा जीवघेणा प्रकारांचा छळ होई. शरीर थकायचे आणि ते कोलूला लटकून पडायचे. ते बेशुद्ध पडत.

याचदरम्यान स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अंदमानमध्ये काळ्या पाण्याची शिक्षा सुनावण्यात आली. नाशिकचे जिल्हाधिकारी जॅक्सन यांना अनंत कान्हेरे यांनी ठार केले. या प्रकरणात वापरण्यात आलेले ब्राऊनिंग पिस्तूल सावरकरांनी पाठवले, असा सरकारला सुगावा लागला. यासाठी त्यांनी सावरकरांना तत्काळ अटक केली. त्यांना दोन जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. तब्बल पाच वर्षांनी अंदमानच्या तुरुंगामध्ये सावरकर बंधूंची भेट झाली. त्यानंतर दोन्ही सावरकर बंधूंनी मिळून अंदमानमधील बंदिवानांसाठी कार्य केले.





**१३ जून : जयंती**

बाबाराव अंदमानमधील अन्याय यंत्रणेच्या विरोधात लढण्याचे काम करायचे. एवढेच नाही तर त्यांनी बंदिवानांचे नेतृत्व केले, त्यांच्यासाठी संप पुकारला. त्यांना चांगल्या सोयी मिळाव्यात, यासाठी लढा दिला. शुद्धीकार्य सुरू केले. पुढे डॉक्टर नारायण सावरकरांनी सावरकर बंधूंची मुक्तता व्हावी, यासाठी फार मोठी चळवळ उभारली. मुंबईच्या 'नॅशनल कमिटी'च्या पुढाकाराने ८० हजार सह्या संग्रहित केल्या. सावरकर बंधू यांच्या सुटकेसाठी प्रयत्न केले. मे १९२१ मध्ये बाबाराव आणि तात्याराव सावरकर यांची अंदमानमधून सुटका करण्यात आली. स्वा. सावरकर यांना रत्नागिरीमध्ये स्थानबद्ध करण्यात आले. १९२२ मध्ये बाबाराव सावरकर यांना साबरमतीच्या कारागृहात हलवण्यात आले. नंतर बाबाराव सावरकर मुंबईला आले. त्यानंतर त्यांनी हिंदूहिताचे व्रत हाती घेतले. त्यानंतर १९२५ मध्ये डॉक्टर हेडगेवार यांना बाबारावांनी संघ स्थापनेसाठी मोलाचे मार्गदर्शन केले. बाबाराव सावरकरांनी त्यांच्या आयुष्यात 'राष्ट्रमीमांसा', 'हिंदूराष्ट्र – पूर्वी, आता आणि पुढे', 'छत्रपती शिवरायांची आग्र्यावरील गरुडझेप', 'विररत्नमंजुषा', 'ख्रिस्त परिचय', 'धर्म हवा कशाला?,' 'वीर बंदा बैरागी' यांसारख्या ग्रंथांची निर्मिती केली. समाजाला दिशा देण्याचे काम केले. बाबाराव सावरकर पक्के देशभक्त होते. त्यांनी आयुष्यभर यातना भोगल्या. कष्टात आयुष्य काढले. अंदमानमध्ये झालेल्या छळामुळे त्यांच्या विविध शारीरिक तक्रारी वाढत होत्या. अर्धशिशीचा त्रास जाणवत होता. गुडघेदुखी होती. त्यांना औषधोपचारांसाठी मुंबई, येवले, नागपूर, अकोला, कोलकाता, जमखंडी अशा विविध ठिकाणी जावे लागले.

## बाबारावांचे अखेरचे दिवस सांगलीत

**बाबाराव यांचे अखेरचे दिवस सांगलीत गेले. सांगलीत आल्यावर त्यांच्या अंगात रक्त कमी होते. तेव्हा सांगली–कोल्हापूरची २०–२५ तरुण मंडळी रक्तदानासाठी पुढे आली.** रक्त देण्याचे काम सुरू झाले. डॉक्टर जोशी, डॉक्टर रानडे, डॉक्टर उदगावकर, डॉक्टर अभ्यंकर यांनी त्यांची सुश्रुषा केली. दि. १४ मार्च रोजी ते अस्वस्थ झाले. श्वास कोंडला. दि. १६ मार्च, १९४५ रोजी दुपारी २ वाजून १५ मिनिटांनी बाबाराव सावरकर यांनी अखेरचा श्वास घेतला. सांगलीच्या 'विक्रम' वृत्तपत्राने विशेषांक काढला. बाबारावांच्या मृत्यूची दुःखद वार्ता सर्वदूर पसरली. ठिकठिकाणी तारा पाठवून बाबारावांच्या निधनाचे वृत्त कळवण्यात आले. बुधगाव, माधवनगर, हरिपूर, जयसिंगपूर, मिरज, कोल्हापूर परिसरातून बाबारावांच्या अंत्यदर्शनासाठी त्यांचे अनुयायी सांगलीमध्ये उपस्थित होते. सात ते आठ हजार लोकांचा समुदाय जमला. ठिकठिकाणी अंत्ययात्रेमध्ये पुष्पहार अर्पण करण्यात आले. रात्री ८.३० वाजता अंत्ययात्रा संपली. कृष्णा नदीच्या पवित्र तीरावर गंगाधरपंत दीक्षित यांच्या जागेमध्ये डॉक्टर नारायणराव सावरकर यांनी बाबारावांना अग्नी दिला. बाबाराव सावरकरांचा जीवनपट म्हणजे साक्षात धगधगते यज्ञकुंड होते. अशा बाबारावांचा सांगली नगरीशी अत्यंत जवळचा संबंध होता. सांगली नगरीत बाबारावांनी ज्या ठिकाणी देह ठेवला, त्याच कृष्णा नदीच्या काठावर त्यांना अग्नी देण्यात आला. अशा या सांगली नगरीला तीर्थक्षेत्राचे मांगल्य प्राप्त झाले.

शिवभक्त भालजी पेंढारकर यांच्या अध्यक्षतेखाली आज या ठिकाणी भव्य स्मारक उभे आहे. क्रांतिवीर बाबाराव सावरकरांचे हिंदुस्थानातील असे हे एकमेव स्मारक आहे. सावरकर भक्तांच्या परिश्रमातून हे स्मारक उभे राहिले. या स्मारकाचे उद्घाटन अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते करण्यात आले होते. या स्मारकाला शिवभक्त बाबासाहेब पुरंदरे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांसारख्या अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या आहेत.

स्वातंत्र्यवीर सावरकर हे विज्ञानवादी, पण बाबाराव हे कमालीचे श्रद्धाळू होते. ते सांगलीत आले की, रस्त्यातून फिरत फिरत हिंदू तरुणांना एकत्र करत त्यांच्या घरगुती अडचणींवर मार्गदर्शन करत. हिंदू संघटनेचे कार्यही त्यांनी अविरतपणे चालू ठेवले. त्यांची वैयक्तिक त्यागाची वेगळीच झळाळी होती. सांगलीमधील त्यांच्या भक्तांनी त्यांची शेवटच्या दोन वर्षांत कमालीची काळजी घेतली. सांगली ते दोन–तीन ठिकाणी राहिले. सकाळी बाहेर पडणे, वाचन–चिंतन करणे, हिंदू संघटन करणे यातच ते गुंतलेले असत. १९४२चे आंदोलन सुरू झाले. फाळणी झाल्याशिवाय स्वातंत्र्य मिळणार नाही, असा प्रचार सुरू होता. त्यामुळे बाबारावांनी हिंदू संघटनेचा आग्रह धरला. बाबाराव मनाने निर्मळ होते. त्यांच्या परिसस्पर्शाने अनेकांचे सोने झाले. बाल, वृद्ध, महिला सर्वांना त्यांनी आदराने वागवले. हिंदू समाजासमोर येणाऱ्या सर्व समस्यांना टक्कर देण्यासाठी हिंदू समाजाला भरपूर मार्गदर्शन त्यांनी सांगलीत केले, हे सांगलीचे भाग्य. संपूर्ण सांगली बाबारावांची झाली होती.

बाबाराव सावरकर, स्वातंत्र्यवीर सावरकर, नारायणराव सावरकर या बंधूंची शेवटची हृद्यभेट सांगलीनगरीने पाहिली. महाराष्ट्र निर्मितीसाठी त्यांनी केलेला सततचा पाठपुरावा सांगलीकरांनी पाहिला. आजही स्मारकाच्या रूपाने क्रांतिवीर बाबारावांच्या प्रत्येक स्मृती सांगलीकरांनी निष्ठेने जपल्या आहेत. सांगली नगरीतील सिद्धार्थ परिसरातील हे स्मारक प्रेरणा देण्याचे काम करत आहे. ५ हजार, ५०० स्क्वेअर फूट जागेत चार हजार स्क्वेअर फूट बांधकाम असून आतमध्ये ग्रंथालय, व्यायामशाळा यासाठी स्वतंत्र हॉल आहेत. क्रांतिवीर बाबारावांची पंचधातूंनी बनवलेली पाच फुटी मूर्ती हे स्मारकाचे वैशिष्ट्य. ही मूर्ती संपूर्ण हिंदुस्थानातील हिंदूंना कायमस्वरूपी प्रेरणा देत राहते.

### स्मारकाची देखभाल

***क्रांतिवीर बाबाराव सावरकर स्मारक आणि स्वातंत्र्यवीर सामाजिक संस्था, सांगली यांच्यावतीने सध्या स्मारकाची देखभाल केली जाते. विविध उपक्रम राबविले जातात. बाबारावांचे विचार सर्व समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी, त्यांचे सामाजिक कार्य पोहोचवण्यासाठी या संघटना दिवसरात्र झटून प्रयत्न करत असतात. अशा या मातृभूमीसाठी आपले सर्वस्व अर्पण करणाऱ्या या भारतमातेच्या महान सुपुत्रास कोटी कोटी प्रणाम...***

## संपादकीय

# राजकारण्यांनी 'उचलली जीभ लावली...' व 'अरेरावी' करण्यावर 'मर्यादा' घालून 'सभ्यते'ने बोलण्याची गरज!

'जो जें वांछील तो तें लाहो' ही शिकवण असतानाही प्रार्थनास्थळी घुसून विशिष्ट समाजाला मारण्याची भाषा, कशी काय पटू शकते? मोहम्मद पैगंबर यांच्याबद्दल रामगिरी महाराज यांनी केलेल्या वक्तव्यावरून वादंग निर्माण झाला होता. अशा वेळी रामगिरी महाराज यांचे समर्थन करताना ङ्गमशिदींमध्ये घुसून मारू,फ असे वक्तव्य त्यांनी केले होते. यावर, कुर्ला येथील मशिदीत येऊन दाखवण्याचे आव्हान त्यांच्याच पक्षाचे म्हणजेच भाजप नेते हाजी अराफत शेख यांनी नितेश राणे यांना दिले होते, हे उल्लेखनीय. आधी काँग्रेस नेते राहुल गांधी आणि नंतर त्यांच्या भगिनी प्रियांका गांधी केरळच्या वायनाड लोकसभा मतदारसंघातून विजयी झाले. त्यावर टिप्पणी करताना केरळ हे मिनी पाकिस्तान असल्याचे म्हटले होते. आता एकसंध भारतातील एका राज्याबद्दल एका आमदाराने असे विधान करणे, अशोभनीय आहे. औरंगजेबाच्या थडग्याचा वादही त्यांनी अशाच प्रकारे पेटवला होता. त्यांनी तर औरंगजेबचे थडगे हटविण्याची ग्वाहीच दिली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या किल्ल्यांवरील अतिक्रमण हटवले आणि नंतर ब्रेकिंग न्यूज दिली. औरंगजेबाच्या थडग्याचाही एक कार्यक्रम नक्कीच होईल, असे ते म्हणाले होते. पण जेव्हा भाजपची मातृसंस्था असलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघानेच या वादावरून कान उपटले तेव्हा वादावर पडदा पडला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सैन्यात कोणीही मुसलमान नव्हते. हिंदू धर्माला संपवण्याची शपथ घेणाऱ्या औरंगजेबाला छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांनीच रोखले.

स्वराज्याची लढाई ही इस्लामच्या विरोधातच होती, हिंदू विरुद्ध मुसलमान अशीच ही लढाई होती, असा जावईशोधही त्यांनी लावला. यावर, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांना इतिहास वाचण्याचा सल्ला दिला. तर, मी अधूनमधून पुस्तके वाचतो, पण नितेश राणे यांनी वाचलेले पुस्तक कदाचित माझ्याकडून वाचायचे राहून गेले असावे, असा टोला भाजपाचे ज्येष्ठ नेते सुधीर मुनगंटीवार यांनी लगावला होता. आता नितेश राणे यांना दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेच अभय आहे का? असा प्रश्न पडतो. 'आमचा बॉस सागर बंगल्यावर आहे,' या त्यांच्या वाक्यापासून ही शंका मनात बळावते. त्यावेळी देवेंद्र फडणवीस यांचा मुक्काम सागर बंगल्यावरच होता आणि आता ते वर्षा या शासकीय बंगल्यावर राहतात. नितेश राणे आता नव्या वादात अडकले आहेत. धाराशिव येथील कार्यकर्ता संवाद मेळाव्यात, 'भाजपचा मुख्यमंत्री सगळ्यांचा बाप बसलेला आहे,' असे वक्तव्य त्यांनी केले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेच्या नेत्यांना उद्देशून त्यांनी हे विधान केले होते. त्यावर, शिंदे गटाच्या तिकिटावर कुडाळ मतदारसंघातून विजयी झालेले निलेश राणे यांनी सर्वात आधी, सर्व गोष्टींचे भान ठेवून बोलण्याचा सल्ला, मोठा भाऊ म्हणून दिला. त्याशिवाय, त्यांचे पिता, खासदार नारायण राणे यांनीही मुख्यमंत्री हा जनतेचा सेवक असतो, अशी समज नितेश राणे यांना दिली.

मशिदीत घुसून मारण्याबाबतचे नितेश राणे यांचे विधान चुकीचे असल्याचे सांगण्याची नामुष्कीही त्यांच्यावर ओढावली होती. आता त्यांनी शिंदे गटाला डिवचल्यामुळे सहाजिकच याचे पडसाद मंगळवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत उमटले होते. शिंदे गटाच्या मंत्र्यांनी, आमचा बाप बाळासाहेब ठाकरे आहेत, तुमचा कोण? असा थेट सवाल करत नितेश राणे यांना समज देण्यास फडणवीस यांना सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी माध्यमांसमोर नाराजी व्यक्त केली. नेत्यांनी अशा प्रकारचे बोलणे टाळले पाहिजे, असे ते म्हणाले. पण याच्या पलीकडे काय? औरंगजेबाच्या थडग्याचा वाद पेटल्यानंतर फडणवीस यांनी नितेश राणे यांना तंबी दिल्याचे वृत्त समोर आले होते. त्यावर खुद्द नितेश राणे यांना विचारले असता, तंबी दिल्याची बातमी माध्यमे चालवतात. मुख्यमंत्र्यांकडे लाडक्या मंत्र्यांची यादी आहे, त्याच्यामध्ये नितेश राणेचे नाव आहे, असे त्यांनी सांगितले. म्हणूनच कदाचित, कथित तंबी किंवा कथित समज बेअसर ठरत असावेत आणि लोकांची मने दुखावणारी वक्तव्ये बेधडक केली जात असावीत, असाच त्याचा अर्थ निघतो. महाविकास आघाडी असो वा महायुती असो मंत्री आणि आमदारांची अरेरावी सर्रास पाहायला मिळत आहे. अधिकाऱ्यावर हात उचलणे, अपमान करणे, अर्वाच्च भाषेचा वापर करणे या गोष्टी पाहायला मिळत आहेत. त्यात काही नेते तर असे आहेत, त्यांच्याकडून चांगल्या वर्तनाची किंवा भाषेची अपेक्षाच ठेवणे निरर्थक आहे. त्यात आघाडीवर आहेत ते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे नेते. सध्या ते फार चर्चेत नाहीत. पण भाजपा नेते आणि विद्यमान मत्स्यव्यवसाय आणि बंदरेमंत्री नितेश राणे सातत्याने वादाच्या भोवऱ्यात आहेत. कोणताही सारासार विचार न करता, सद्सद्विवेकबुद्धी न वापरता बेधडक विधाने करणे, ही आता नितेश राणे यांची 'खासियत'च म्हणावी लागेल. मंत्री नितेश राणे हे कथित हिंदुत्वाचा झेंडा घेऊन जाताना दिसतात. संस्कार हा हिंदुत्वाचा गाभा आहे. पण तोच पाहायला मिळत नाही. राजकारण्यांनी 'उचलली जीभ लावली...' व 'अरेरावी' करण्यावर 'मर्यादा' घालून 'सभ्यते'ने बोलण्याची गरज निर्माण झाली आहे.

**हॅलो प्रभात**


**प्रल्हाद केशव अत्रे हे मराठीतील नावाजलेले लेखक, कवी, नाटककार, संपादक, पत्रकार, मराठी व हिंदी चित्रपट निर्माते, शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी व वक्ते होते. ते महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी उभ्या राहिलेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील प्रमुख नेते होते. त्यांना आचार्य अत्रे असे म्हटले जात होते. अत्र्यांच्या घणाघाती भाषणांमुळेच संयुक्त महाराष्ट्र मिळाला असे मानले जाते. आज १३ जून रोजी त्यांचा स्मृतिदिन आहे. त्यानिमित्ताने अत्रेंविषयी थोडेसे...**

दिवंगत साहित्यिक प्रल्हाद केशव अत्रे यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९८ रोजी झाला. अष्टपैलू साहित्यिक, शिक्षणतज्ञ, चित्रपटनिर्माते–दिग्दर्शक, वृत्तपत्रकार, वक्ते आणि नेते म्हणून ते संपूर्ण महाराष्ट्राला परिचित होते. त्यांनी जन्मगाव सासवड, पुणे, मुबंई आणि लंडन येथून बी. ए., बी. टी., टी. डी. पर्यंतचे शिक्षण पुर्ण केले. भारतात परतण्यापूर्वी हॅरो येथे त्यांनी अध्यापन केले. पुण्यातील कॅम्प एज्यूकेशन सोसायटीच्या शाळेत अत्रे अध्यापक होते. या शाळेचे ते पुढे मुख्याध्यापकही झाले. मनवयुग वाचनमालेफद्वारे त्यांनी लिहिलेली शालेय क्रमिक पुस्तकं हे त्यांचं शैक्षणिक क्षेत्रातील मोठं योगदान माणले जाते. त्यांची टोकदार लेखणी, बोचरा विनोद आणि दिलदार वृत्तीला महाराष्ट्र कधीही विसरू शकणार नाही. प्रल्हाद केशव अत्रे हे महाराष्ट्रातील एक झंझावाती व्यक्तिमत्व होतं. साहित्य, शिक्षण, नाटक, चित्रपट, राजकारण व पत्रकारिता अशा विविध क्षेत्रात त्यांना आपला ठसा उमटवला. या सर्वच क्षेत्रामध्ये त्यांचा विलक्षण दबदबा होता. जनमानसावर त्यांचा प्रचंड पगडा होता. ते फर्डे वक्ते होते. आपल्या वक्तृत्वाने ते श्रोत्यांना भारावून टाकत असत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये त्यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली. काही काळ ते महाराष्ट्र विधानसभेत आमदारही होते. त्यांच्या काळातही विद्वान व साहित्यिकांबरोबर त्यांचे वादही खूप गाजले. आचार्य ही बिरुदावली त्यांना प्राप्त झाली होती. तेव्हाचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी त्यांचे ऋरायटर अ‍ॅन्ड फायटर ऑफ महाराष्ट्रऋ असे यथार्थ वर्णन केले होते.

आचार्य अत्रेंनी १९३३ मध्ये नाट्य व चित्रपटसृष्टीत प्रवेश केला. मास्टर विनायक यांनी दिग्दर्शित केलेल्या ब्रम्हचारीऋ ऋब्रॅन्डीची बाटलीऋ या चित्रपटांच्या कथा पटकथा त्यांनी लिहिल्या. पायाची दासी, ऋधर्मवीरऋ हे त्यांचे आणखी काही उल्लेखनीय चित्रपट आहेत. साने गुरुजींची ङ्गश्यामची आईफ या पुस्तकावर त्यांनी १९५३ साली चित्रपट बनविला. १९५४ साली या चित्रपटाला पहिले राष्ट्रपती पदक मिळाले. याशिवाय महात्मा फुले यांच्या जीवनावरील चित्रपटाची निर्मितीही त्यांनी केली. अत्र्यांच्या बहुतांशी चित्रपटांमध्ये विनोद आणि सामाजिक आशय यांचं चपखल मिश्रण आढळून येतं. त्यांनी हिंदी चित्रपटाचीही निर्मिती केली.

१९२३ साली अत्रे यांनी मअध्यापनफ मासिक सुरू केले. १९२६ मध्ये मरत्नाकरफ आणि १९२९ ला ममनोरमाफ, पुढे १९३५ मध्ये मनवे अध्यापनफ व १९३९ मध्ये मइलाखा शिक्षकफ ही मासिके काढली. १९ जानेवारी १९४० साली त्यांनी नवयुग साप्ताहिक सुरू केले. त्यानंतर ते अखेरपर्यंत वृत्तपत्रक्षेत्रातच ते कार्यरत राहिले. याचबरोबरच ङ्गअत्रे थिएटर्सफ या नाट्यसंस्थेमार्फत रंगभूमीशी त्यांचे व्यावसायिक नाते राहिले. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात त्यांनी आपली कर्तुत्व आणि लेखणी यांद्वारे मोठे कार्य केले.

आचार्य अत्रेंनी १९४७ रोजी जयहिंद हे सांजदैनिक आणि १५ नोव्हेंबर १९५६ रोजी मराठा हे दैनिक सुरू केले. त्यांच्या राजकीय कर्तृत्वाचा विकास संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या काळातच झाला.




वक्तृत्व व वृत्तपत्र ही त्यांची प्रभावी साधने होती. मृत्युलेख व अग्रलेख ही त्यांची खासियत होती. लोकप्रिय वक्ते म्हणूनही त्यांचा मोठा लौकिक होता. अत्र्यांचे भाषण म्हणजे हशा व टाळ्यांच्या माध्यमातून परखड विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचे हुकमी साधन होते. फार काय, तर आचार्य अत्रेंच्या घणाघाती भाषणांमुळेच संयुक्त महाराष्ट्र मिळाला असे मानले जाते.

आचार्य अत्रे यांनी गडकरी आणि फ्रेंच प्रहसनकार मोल्येर यांना गुरु मानले होते. त्यांचा प्रभाव अत्रेंच्या नाटकांवर पडलेला दिसतो. त्या नाटकांत सामाजिक दोषदर्शन व दंभस्फोट आहेत. परंतु उपहास, उपरोध, विडंबन व अतिशयोक्ती या विनोदसाधनांच्या द्वारा त्यांचे सादरीकरण केले आहेत. साष्टांग नमस्कार (१९३३), भ्रमाचा भोपळा (१९३५) आणि लग्नाची बेडी (१९३६) हे त्यांचे काही लोकप्रिय नाटके आहेत. घराबाहेर (१९३४) व उद्याचा संसार (१९३६) ही अत्रेंची विशेष गंभीर व सामाजिक समस्यात्मक नाटके आहेत. त्याकाळी विशेष अनुकरणीय ठरलेल्या इब्सेन या नॉर्वेजियन नाटककाराचा प्रभाव अत्रेंच्या या दोन्ही नाटकावर झालाचे भासते.

*नाशिक येथे १९४२ मध्ये भरलेल्या सत्ताविसाव्या महाराष्ट्र साहित्य–संमेलनाचे ते अध्यक्ष होते. अडतिसावे नाट्यसंमेलन (बेळगाव, १९५५), दहावे मराठी पत्रकार–संमेलन (१९५०) व बडोदे, इंदूर व ग्वाल्हेर येथील प्रादेशिक साहित्यसंमेलने यांची अध्यक्षपदेही त्यांनी विभूषित केली होती. १३ जून १९६९ मुंबई येथे त्यांचे निधन झाले.*



# वटपौर्णिमेनिमित्त वृक्षसंवर्धनाची शपथ घेत वडाच्या झाडाचा ३०वा वाढदिवस साजरा..!

**कोल्हापर : हॅलो प्रभात**

नागाळा पार्क येथील पिनाक प्रासाद सोसायटीमध्ये वटपौर्णिमेनिमित्त वडाच्या झाडाचा ३० वा वाढदिवस पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यात आला. भारतीय धर्मसंस्कृतीनुसार औक्षण करत महिलांनी सती सावित्रीच्या गीतांमधून वडाच्या झाडाचे महत्त्व विशद केले आणि पतीराजाच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली.

**ही पूजा करणे ही संस्कृतीची परंपरा...**

या कार्यक्रमाचे आयोजन लिंगायत राणी चन्नम्मा महिला मंडळाच्या संस्थापिका सौ. राजश्री संतोष सावर्डेकर यांच्या संयोजनात झाले. त्या म्हणाल्या, निसर्गाने वडाच्या झाडाला दिलेले दीर्घायुष्य हेच पतीला मिळावे, म्हणून महिलांनी ही पूजा करणे ही संस्कृतीची परंपरा आहे.

कार्यक्रमात महिलांनी सतीची पुण्याई हे भक्तिगीत सादर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. वटपौर्णिमेच्या निमित्ताने महिलांनी वडाच्या झाडाचे औक्षण करून पूजन केले. सर्वांना आरोग्यदायी वडाच्या झाडाचे महत्त्व पटवून देण्यात आले. उपस्थित महिलांना फळांचे वाटप करण्यात आले.

**वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धनाचा संकल्प...**

यावेळी पर्यावरण पूरक संदेश देत महिलांनी एक झाड प्रत्येक घरात ही शपथ घेत वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाचा संकल्प केला. या कार्यक्रमात राजश्री सावर्डेकर, ज्ञानेश्वरी मांगलेकर, जानकी मांगलेकर, ज्योती कुमठेकर, शकुंतला शेवाळे, उज्वला भुटे, सीमा पडवळ, श्वेता चव्हाण यांच्यासह अनेक महिला सहभागी झाल्या होत्या.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली – ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात,** कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली– ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय :** १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे–४११०३०
■ **सांगली शहर संपर्क : ९०२१६५१९७६** ■ **कोल्हापूर कार्यालय :** एस ९४६, GF–७, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर–४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायकक्षेत) ■ **Email : ehelloprabhat@gmail.com**
■ सह संपादक : सार्थक पाटील ■ सल्लागार संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर

# अश्विनी पाटील यांनी स्वीकारला मनपा 'उपायुक्त'पदाचा पदभार

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली, मिरज, कुपवाड महानगरपालिकेच्या उपायुक्त म्हणून अश्विनी पाटील यांनी पदभार स्वीकारला. उपायुक्त शिल्पा दरेकर यांची बदली झाल्याने त्यांच्या रिक्त होणाऱ्या पदावर अश्विनी पाटील उपायुक्त म्हणून रुजू झाल्या आहेत. आज महापालिका आयुक्त सत्यम गांधी यांची उपायुक्त अश्विनी पाटील यांनी भेट घेतली. त्यानंतर उपायुक्त म्हणून त्या रुजू झाल्या. त्यांच्याकडे आस्थापना आणि सामान्य प्रशासन आणि निवडणूक कामकाज याचा कार्यभार सोपवण्यात आला आहे.

दरम्यान नूतन उपायुक्त अश्विनी पाटील यांचे उपायुक्त शिल्पा दरेकर यांनी स्वागत केले. यावेळी



सहाय्यक लेखाधिकारी धनंजय जाधव उपस्थित होते. उपायुक्त अश्विनी पाटील यांना उपायुक्त साबळे यांची केबिन देण्यात आली असून त्यांनी आपल्या कामकाजाला सुरुवात केली आहे. सावंतवाडी नगरपालिकेत त्यांनी काही चांगले उपक्रम राबविले आहेत. त्याचं धर्तीवर आयुक्त सत्यम गांधी, अतिरिक्त आयुक्त रविकांत अडसूळ यांच्या मार्गदर्शनाखाली सांगली, मिरज, कुपवाडमध्ये चांगले उपक्रम राबविण्याचा माणस नूतन उपायुक्त पाटील यांनी सांगितले.

# नविद मुश्रीफ यांची उपमुख्यमंत्री शिंदे व दुग्धविकास मंत्री सावे यांच्याशी भेट

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

कोल्हापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, कोल्हापूर (गोकुळ) चे नुतन चेअरमन नविद मुश्रीफ व संचालक मंडाने मुंबई येथील सह्याद्री अतिथिगृह येथे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच दुग्धविकास मंत्री अतुल सावे यांची सदिच्छा भेट घेऊन गोकुळ दूध संघाच्या विविध योजनांची व प्रलंबित विषयांची माहिती दिली.



यावेळी गोकुळ दूध संघाच्या ग्रामीण भागातील दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, सौरऊर्जा प्रकल्प, स्लरी प्रकल्प, वासरू संगोपन योजना, मुंबई, पुणे डेअरी विस्तार तसेच मुंबई येथील प्रलंबित भूखंडासंदर्भातील विषययावर सविस्तर चर्चा झाली. यावेळी उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मुंबईसारख्या महानगरात गोकुळ दूध आणि दुग्धजन्य पदार्थांना ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

गुणवत्तेच्या माध्यमातून गोकुळने नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण केला असून हा विश्वास कायम राखून संस्था अधिक ग्राहकाभिमुख व्हावी आणि बाजारपेठेत आपले स्थान आणखी मजबूत करावे. असे मनोगत व्यक्त केले

अतुल सावे यांनी सांगितले, दुग्ध व्यवसायाच्या विस्तारासाठी आवश्यक ते धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. गोकुळसारख्या नामांकित संस्थेला प्रलंबित विषयांवर शासनस्तरावर सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल. असे सांगितले. यावेळी ना. हसन मुश्रीफ, ना. प्रकाश आबिटकर, आ.चंद्रदीप नरके, चेअरमन नविद मुश्रीफ, विश्वास पाटील, अभिजित तायशेटे, अजित नरके, शशिकांत पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

# इचलकरंजी परिसरात कर्नाटक बेंदूर सण उत्साहात

**इचलकरंजी : हॅलो प्रभात**

इचलकरंजी हे महाराष्ट्र-कर्नाटक सिमाभागाजवळील महाराष्ट्रातील मोठे शहर आहे. पण येथे कर्नाटक बेंदूर सण मोठ्या उत्साहात साजरा करण्याची परंपरा आहे. त्यानुसार आज बेंदरानिमीत्त शेतकरी बांधवांनी वर्षभर शेतात काबडकष्ट करण्यासाठी आपल्या सोबत असणाऱ्या बैलांना सजवुन, पुजा करुन, गोडधोड खाऊ घातले. अनेक हौशी शेतकऱ्यांनी आपल्या बैलांची गावातून सवाद्य मिरवणुकही काढली. त्यामुळे दिवसभर आज शहरात शेतकऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण दिसत होते



येथे कर्नाटक बेंदुरानिमीत्त बैलांच्या लाकुड ओढण्याच्या शर्यतींना शतकोत्तरी परंपरा आहे. या शर्यती पाहण्यासाठी शौकीनांची मोठी गर्दी होत असते. जनावरांच्या प्रदर्शनातही जातिवंत जनावरं सहभागी होत असतात. बेंदूर सणादिवशी विविध स्पर्धांचा बक्षिस वितरण आणि कर तोडणीच्या कार्यक्रमामुळे तर गावभागाला जत्रेचे स्वरुप येते. शेतकरी आपल्या लाडक्या बैलांना न्हाऊ घालून रंगीबेरंगी दोऱ्या, रेबीन, झुल यासह सजावटीच्या साहित्याने आकर्षक सजवतात. त्यामुळे महात्मा गांधी पुतळा ते मलाबादे चौक या मार्गावर भरलेल्या बाजारात खरेदीसाठी शेतकऱ्यांची बुधवारी सायंकाळी गर्दी दिसत होती.

आज सकाळी शेतकऱ्यांनी बैलांना पंचगंगा नदीत न्हाऊ घालून आकर्षक सजावट करून सवाद्य मिरवणुक काढली. बैलांचे औक्षण करून महिलांनी गोडधोड खाऊ घातल्यावर पुन्हा भागाभागात सजवलेल्या बैलांची मिरवणुक काढण्यात येत होती. यामुळे दिवसभर शहर परिसरात शेतकऱ्यांच्यात उत्साहाचे वातावरण दिसत होते. दुपारनंतर ढगांच्या कडकडाटासह पावसाने जोरदार हजेरी लावल्याने सायंकाळी मिरवणुकीचे नियोजन केलेल्यांचा काहीसा हिरमुड झाल्याचे दिसत होते.

# मोकळ्या जागांमध्ये वाढला झुडपांसह डासांचा प्रादुर्भाव

## ताबडतोब उपायोजना करा : मनोज भिसे यांची मागणी

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली, मिरज व कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनेक मोकळे प्लॉट आहेत. शिवाय महापालिका क्षेत्रात अनेक विस्तारित भाग असून या ठिकाणी सोयी सुविधा म्हणाव्या तितक्या नसल्याने या ठिकाणच्या मोकळ्या प्लॉटमध्ये सध्या पावसामुळे पाणी साठून राहत आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर झाडे, झुडपे व गवत वाढले आहे.

या ठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे डासांचे प्रमाण अतिशय वेगाने वाढले आहे. परिणामी डेंग्यू, मलेरिया इत्यादी रोगांचा प्रादुर्भाव वाढत असून त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला निर्माण झाला आहे.

या ओपन प्लॉट्समध्ये विषारी सापांसह सरपटणाऱ्या प्राण्यांचीही वाढ झाली असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन सदर सर्व ओपन प्लॉट्सची महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत पाहणी करावी. संबंधित प्लॉट मालकांना तातडीने नोटीस देऊन त्यांच्याकडून प्लॉट स्वच्छ करून घ्यावा व योग्य भराव टाकण्याचे निर्देश द्यावेत. महानगरपालिकेमार्फत या ठिकाणी कीटकनाशक फवारणी व आवश्यकतेनुसार औषधोपचार करण्यात यावा. अशी मागणीच्या वतीने अध्यक्ष मनोज भिसे यांनी महापालिका प्रशासनाकडे केली आहे.

# माननीय आमदार मोहनराव कदम वाढदिवस साजरा करणार नाहीत

**वांगी : हॅलो प्रभात**





डॉ. पतंगराव कदम सोनहिरा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आणि सांगली सातारा विधानपरिषदेचे माजी आमदार वनश्री मोहनराव कदम व भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम यांचा १५ जून रोजी वाढदिवस आहे.परंतु त्यांच्या कुटुंबामध्ये गेल्या काही महिन्यामध्ये घडलेल्या दुखद घटनांमुळे आणि पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे मा. आ. मोहनराव कदम व डॉ. शिवाजीराव कदम हे बाहेरगावी असलेमुळे शुभेच्छा स्विकारण्यास उपस्थित राहू शकणार नाहीत, अशी माहिती कारखान्याचे कार्यकारी संचालक एस. एफ. कदम यांनी दिली.यावेळी कारखान्याचे संचालक मंडळ उपस्थित होते.

# डी.वाय.पाटीलच्या विद्यार्थ्यांची स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये निवड

**तळसंदे : हॅलो प्रभात**

डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ ॲग्रिकल्चरल इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, तळसंदे (बी.टेक. ग्री) महाविद्यालयाच्या सानिका उत्तम खद्रे व अभिजित पंढरीनाथ गांगुर्डे या दोन माजी विद्यार्थ्यांची स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये निवड झाली आहे.

महाविद्यालयाच्या २०१९-२०२३ बॅचचा विद्यार्थी अभिजित पंढरीनाथ गांगुर्डे आणि २०२०-२०२४ बॅचची विद्यार्थिनी कु. सानिका उत्तम खद्रे यांची स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये ज्युनियर असोसिएट पदासाठी निवड झाली आहे. सानिका व अभिजित दोघेही अभ्यासात अतिशय





हुशार होते. त्याचबरोबर महाविद्यालयामध्ये आयोजित होणाऱ्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग असायचा.

प्राचार्य डॉ. सुहास पाटील म्हणाले, महाविद्यालय नेहमीच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असते. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, त्यासाठी पूरक वातावरण, व्याख्याने यांचे आयोजन केले जाते. याचा फायदा विद्यार्थ्यांना होत आहे. आमचे माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात यश मिळवत असून, हे आमच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे प्रतिक आहे. शुभम आणि मेघा यांचे यश हे पुढील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे. संस्थेचे अध्यक्ष डॉ. संजय डी. पाटील, उपाध्यक्ष आमदार सतेज पाटील, विश्वस्त ऋतुराज पाटील, कार्यकारी संचालक डॉ. ए. के. गुप्ता यांनी अभिजित व सानिका यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# स्कोडा ऑटो भारताच्या विकासासाठी सज्ज

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

वर्ष २०२५ जगभरातील स्कोडा ऑटोसाठी महत्त्वपूर्ण आहे, जेथे यंदा संपन्न वारसाची १३० वर्षे आणि भारतात २५ उत्साहवर्धक वर्षे साजरी केली जात आहे. ग्राहकांच्या जवळ पोहोचण्याच्या धोरणाला अधिक दृढ करत स्कोडा ऑटो इंडियाने भारतातील बाजारपेठेमधील गतीला चालना देण्यासाठी प्रमुख ब्रँड, उत्पादन, नेटवर्क आणि ग्राहक-केंद्रित उपक्रमांची रूपरेषा आखली आहे.



याप्रसंगी मत व्यक्त करत स्कोडा ऑटो इंडियाचे ब्रँड संचालक आशिष गुप्ता म्हणाले, भारत युरोपबाहेर स्कोडा ऑटोसाठी सर्वात महत्त्वाची विकास बाजारपेठ आहे. आम्ही उद्देशपूर्ण क्षमता, सुस्पष्ट दृष्टिकोन आणि गतीशील अंमलबजावणीसह मजबूत, भविष्यासाठी सुसज्ज ब्रँड निर्माण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. आमचे प्रॉडक्ट ऑफेन्सिव्ह धोरण ग्राहकांच्या सर्वसमावेशक गरजा आणि महत्त्वाकांक्षांशी सुसंगत आहे, जे आमच्या प्रगतीप्रती प्रवासाला गती देत आहे. आम्ही ग्राहकांच्या जवळ पोहोचत आहोत, धोरणात्मकरित्या आमचे नेटवर्क विस्तारित करत आहोत आणि दर्जा, सुरक्षितता व मूल्याप्रती आमचा वारसा अधिक दृढ करत आहोत. आमच्या सर्व व्यवसाय कार्यांमध्ये विकासाला गती देण्यासह २०२५ उत्तम वर्ष ठरेल, जेथे आम्ही मोठ्या प्रमाणात ब्रँडला प्रबळ करू आणि भारतात प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत राहू.

# वठार ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अश्विनी कुंभार

**घुणकी : हॅलो प्रभात**

वठार तर्फे वडगांव (ता. हातकणंगले) वठार ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदासाठी सोमवारी झालेल्या विशेष सभेत अश्विनी कुंभार यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

उपसरपंचपदासाठी एकूण तीन उमेदवारांचे अर्ज दाखल झाले होते, मात्र दोन उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने सौ. कुंभार यांचा एकमेव अर्ज राहिला. त्यामुळे त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे सरपंच तथा निवडणूक अधिकारी सचिन कांबळे यांनी जाहीर केले.


या निवडीप्रसंगी वाठार ग्रामपंचायतीमध्ये उत्साही वातावरण होते. वारणा दूध संघाचे संचालक महेंद्र शिंदे, सूर्यकांत शिर्के, राजाराम क्षीरसागर, बी. एस. पाटील, माजी प्रभारी सरपंच महेश कुंभार, राहुल पोवार, सदस्या सुशीला चौगुले, महेश शिर्के, रेश्मा शिंदे, नाजुका भुजिंगे, तेजस्विनी वठारकर, रुकसाना नदाफ, तसेच रमेश गायकवाड, अभिजीत सुतार, सुशील जिवरसकर, राजकुमार शिंदे, गोरखनाथ शिंदे, विनायक माळी, राजेंद्र शिर्के, संतोष वठारकर, संदीप पाटील, गणेश कुंभार, असिफ पटाईत आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी ग्रामविकास अधिकारी श्री. डी. डी. शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले. नव्याने निवड झालेल्या अश्विनी यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या

# अहमदाबादमध्ये विमान दुर्घटनेत 241 जणांचा मृत्यू

(पान १ वरून)

गुजरातच्या अहमदाबादमध्ये मोठी विमान दुर्घटना घडली असून तब्बल २४२ प्रवाशांना घेऊन जाणारं प्रवासी विमान अहमदाबादच्या मेघानीनगर परिसरात कोसळलं आहे. एअर इंडियाच या विमानाने अहमदाबादहून लंडनसाठी उड्डाण केले होते. मात्र, दुपारी १.३१ वाजता केलेल्या उड्डाणानंतर अवघ्या काही मिनिटांतच विमान खाली कोसळलं. या दुर्घटनेनंतर काही वेळातच ३ अग्निशमन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. सध्या, एनडीआरएफचे पथक आणि प्रशासनाकडून युद्धपातळीवर बचावकार्य सुरू करण्यात आले. विमानातील प्रवाशांची अधिकृत माहिती उपलब्ध झालेली नाही. मात्र, या विमानातून गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी हे देखील प्रवास करत होते, अशी प्राथमिक माहिती आहे. विमान दुर्घटनेनंतर गृहमंत्री अमित शाह यांनी गुजरातच्या मुख्यमंत्र्यांना फोन करुन माहिती घेतली, तसेच सर्वोतोपरी मदतीचे आश्वासनही दिले.





गुजरातमधील अहमदाबाद इथे एअर इंडियाच्या विमानाचा भीषण अपघात झाला असून ७०० फुटांवरुन मेघानीनगर या नागरी वस्तीत हे विमान कोसळलं. अपघाताची माहिती मिळताच स्थानिकांनी व प्रशासनाने तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. विमानातून १० क्रू मेंबरांसह तब्बल २४२ प्रवासी प्रवास करत होते. विमान अपघाताचे व्हिडिओ सोशल मीडियात व्हायरल झाले असून, जिथे प्लेन क्रॅश झालं, त्याठिकाणी धुराचे मोठे लोळ पसरल्याचं व्हिडिओतून दिसून येत आहे, घटनास्थळी विविध बचाव पथक दाखल झाले आहेत. मात्र, या दुर्घटनेत मोठी जिवितहानी झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अहमदाबादहून लंडनला म्हणजेच दूर मार्गावर जाणार असल्याने या विमानात इंधन देखील मोठ्या प्रमाणात भरण्यात आलं होतं, त्यामुळे अपघातानंतर दुर्घटनास्थळी मोठा स्फोट झाला.

### पायलटचा दुर्घटनेपूर्वी आपात्कालीनचा संदेश

विशेष म्हणजे विमान दुर्घटनेपूर्वी विमानाचे पायलट कॅप्टन सुमित सभरवाल यांनी आपत्कालीनचा संदेश (मे डे कॉल) दिला होता.

कॅप्टन सभरवाल यांना तब्बल ८२०० तासांच्या प्रवास उड्डाणाचा अनुभव होता. विमानाने दुपारी १.३१ वाजता उड्डाण केल्यानंतर १.३८ मिनिटांनी विमानाचा शेवटचा सिग्नल मिळाला होता. त्यानंतर दुपारी ही दुर्दैवी दुर्घटना घडली.

### विमान रुग्णालयाच्या इमारतीवर कोसळले

एअर इंडियाचं हे विमान एका इमारतीवर कोसळलं असून ती इमारत रुग्णालयाची असल्याची माहिती समोर आली आहे. मिळालेल्या माहितीनुसार विमान ज्या रुग्णालयावर कोसळलं त्या रुग्णालयातील १५ डॉक्टर जखमी झाले असून काही रुग्णांना देखील गंभीर दुखापत झाल्याची माहिती आहे.

### टाटा ग्रुपची मोठी घोषणा

अहमदाबाद इथं झालेल्या एअर इंडियाच्या विमानाचा गुरुवारी भीषण अपघात झाला. या अपघातात विमानातून प्रवास करणाऱ्या २४२ प्रवाशांपैकी केवळ एक जण बचावल्याची माहिती सध्या मिळते आहे. पण ज्या प्रवाशांचा मृत्यू झाल्याचं निश्चित झालं आहे, त्या प्रवाशांच्या कुटुंबियांना प्रत्येकी १ कोटी रुपयांची नुकसान भरपाई देण्यात येणार आहे. टाटा ग्रुपनं ही मोठी घोषणा केली आहे.

# 'आत्मा मालिक' संस्था 'प्रेरणा गौरव' पुरस्काराने सन्मानित

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

कल्याणी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नाशिक या संस्थेच्या वतीने अध्यात्मिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल आत्मा मालिक ध्यानपिठ कोकमठाण या संस्थेस नुकताच राष्ट्रीय प्रेरणा गौरव पुरस्कार देवून गौरविण्यात आले. अध्यात्मिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करणाया संस्थासाठी हा पुरस्कार मानाचा व विशेष सन्मानाचा मानला जातो. हा पुरस्कार धर्मदाय सहआयुक्त म.ला. जोगी यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आला. आत्मा मालिक संस्थेच्यावतीने संस्थेचे मुख्य लेखापाल गोपाल कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्विकारला. यावेळी व्यासपिठावर श्री. रामकृष्ण आरोग्य संस्थान नाशिकचे अध्यक्ष स्वामी कंठानंद, धर्मदाय आयुक्त वी. र. सोनुने, धर्मदाय सह आयुक्त म. ला. जोगी इ. मान्यवर उपस्थित होते.

दैनिक **हॅलो प्रभात**

■ सांगली ■ कोल्हापूर ■ शुक्रवार, १३ जून २०२५








## जागतिक योगदिन कार्यक्रमात शिक्षण संस्था उतरणार : रावसाहेब पाटील

**सांगली : हॅलो प्रभात**



२१ जून हा दिवस दरवर्षी जागतिक योग दिन म्हणून साजरा केला जातो. यंदा हा दिन सांगली जिल्हा परिषद,विश्वयोग दर्शन सांगली आणि चितळे डेअरी भिलवडी यांच्या एकत्रित आयोजनाने वारकरी तालावर मभक्ती योगफम्हणून दि. २१ जून रोजी स. ८.०० ते ८.४५ या वेळेत संपन्न होणार आहे. कार्यक्रमाचे मुख्य केंद्र छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम सांगली असून १० तालुक्यातील शाळा, महाविद्यालये ठिकाणे विहीत नोंदणीद्वारे निश्चित केली जाणार आहेत. सदर कार्यक्रमाची वर्ल्ड, आशियाई व इंडीया बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद होणार आहे. या कार्यक्रमाला विहीत पध्दतीने जास्तीत जास्त नोंदणी करुन शाळा महाविद्यालयांचा लक्षवेधी सहभाग राहणार असून जिल्ह्यातील सर्व खासगी शिक्षण संस्थांना कळवले असून सर्व शिक्षण संस्था आपल्या शाळा महाविद्यालयांच्या माध्यमातून शिस्तबद्धपणे व ताकदीने या कार्यक्रमात उतरणार असल्याचे सांगली जिल्हा शिक्षण संस्था संघाचे अध्यक्ष रावसाहेब पाटील यांनी सांगितले.योग हे संपूर्ण जीवनशैलीचे तंत्रज्ञान आहे. भक्तीमय वारकरी तालाची साथ हे यंदाच्या योगदिनाचे खास वैशिष्ट्य असल्याने शिक्षण, सांस्कृतिक आणि क्रिडा व आरोग्य याबाबत योगाचे महत्त्व अधोरेखित करणारे आहे. जिल्ह्यातील सर्व खासगी शिक्षण संस्थांनी या कार्यक्रमात आपल्या शाळा व महाविद्यालयांचा शिक्षण खात्याच्या सूचनेनुसार विहित पध्दतीने सहभाग नोंद करुन मभक्ती योगफकार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांगली जिल्हा परिषद, प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभागांना सहकार्य करावे, असे आवाहन रावसाहेब पाटील यांनी केले आहे.

# कडेगांव शहरातील कॅनॉल 'बंदिस्त' होणार : नगराध्यक्ष धनंजय देशमुख

### जलसंपदा मंत्री विखे-पाटील यांना दिले निवेदन

**कडेपूर : हॅलो प्रभात**

कडेगाव शहरातून जाणाऱ्या कॅनॉलमुळे शहरातील अनेक कूपनलिका, छोट मोठे आढ, नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा विहिरींना खूप मोठा फायदा होत असतो. कडेपूर, हिंगणगाव खुर्दचा काही भाग या कॅनॉल मुळे ओलिताखाली येत असतो. १९७२ च्या दुष्काळात या कॅनॉलचे काम पूर्ण झाले असून या कॅनलला कडेगाव लघुपाट बंधारे तलावातून पाणी येत असते. या कॅनॉला पाणी आल्यानंतर कॅनॉललगत असणाऱ्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान पाण्यामुळे होत असते. शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी गोविंदगिरी कॅनॉल बंदिस्त करण्याबाबतचे



निवेदन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना माजी आमदार पृथ्वीराज देशमुख यांच्याहस्ते देण्यात आले.

यावेळी कडेगावचे नगराध्यक्ष धनंजय देशमुख, उपनगराध्यक्ष पै. अमोल डांगे, हाजी मुक्तार पटेल, युवराज राजपूत व इतर प्रमुख उपस्थित होते.

जलसंपदा मंत्री विखे पाटील यांनी कडेगाव शहरातील कॅनॉल बंदिस्त करण्याबाबतचे काम. तूर्तास मार्गी लावू, असे आश्वासन दिले असल्याची माहिती कडेगावचे नगराध्यक्ष धनंजय देशमुख यांनी दिली.

## तुंग येथे विकसित कृषि संकल्प अभियान यात्रा संपन्न

**सांगली : हॅलो प्रभात**

विकसीत कृषि संकल्प यात्रा अंतर्गत भारत सरकारच्या कृषी व किसान कल्याण मंत्रालय, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, कृषी विज्ञान केंद्र, सांगली, कृषी विभाग सांगली आणि



आत्मा प्रकल्प सांगली यांच्या संयुक्त प्रयत्नातून आयोजित कृषी संकल्प अभियान हा महत्वाकांक्षी कार्यक्रम मिरज तालुक्यातील तुंग गावामध्ये यशस्वीरित्या पार पडला.

कार्यक्रमास सरपंच विमलताई सूर्यवंशी, कृषी विज्ञान केंद्र कांचनपूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. विपिन वाले, मृदा शास्त्रज्ञ शैलेश पाटील, कृषी विस्तार शास्त्रज्ञ सचिन कोल्हे, खउ-ठ अजैविक ताण व्यवस्थापन संस्था बारामतीचे हवामान शास्त्रज्ञ डॉ. सुधीर कुमार मिश्रा, पशुवैद्यकीय महाविद्यालय शिरवळचे डॉ. अभिजीत बाराते, आत्मा प्रकल्प तालुका तांत्रिक व्यवस्थापक वैभव यादव, सहाय्यक कृषी अधिकारी प्रियांका चव्हाण, विकास मगदूम आदि मान्यवर उपस्थित होते. डॉ. विपिन वाले यांनी पशुपालन या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. दुधाचे दर फॅटवर अवलंबून असतात त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांनी याची काळजी घ्यावी. पशूंच्या माजावस्थेची (हीट सायकल) ओळख करणे शेतकऱ्यांसाठी अत्यंत गरजेचे असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

मृदा शास्त्रज्ञ शैलेश पाटील यांनी शेतकऱ्यांना माती परीक्षणावर आधारितच खतांचा योग्य वापर करावा, यामुळे जमिनीचे आरोग्य टिकून राहते, असे आवाहन केले.

## दलित महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदी संजय केंगार

**उमदी : हॅलो प्रभात**

दलित महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे यांचा जत पूर्व भागांमध्ये दलित महासंघाचे दौरा झाला. यावेळी हळळी येथे कार्यक्रमात त्यांनी दलित महासंघाच्या सांगली जिल्ह्याच्या उपाध्यक्षपदी संजय केंगार यांची निवड केली. तसे पत्रही त्यांना सुपूर्द करण्यात आले. त्याचबरोबर यावेळी महाराष्ट्र



राज्याच्या महिला अध्यक्ष पुष्पलता सकते, विद्यार्थी संघटनेचे जिल्हाध्यक्ष धर्मा कवडे, जक्कव्वा गेजगे, वाचनालयाचे अध्यक्ष तुकाराम वालेकर, रायगोंडा केंगार ,पत्रकार संजय एवळे, शिवानंद कवडे,प्रल्हाद नाटीकर,आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी धर्मा कवडे यांनी संघटने विषयी विविध माहिती दिली, तर सतीश अजमाने यांनी दलितावर होणारे आजवरचे अन्याय व त्या विरोधात लढा कसा उभारावा हे आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सकटे बोलताना म्हणाले, दलित महासंघाच्या कार्यक्रमाला जे लोक आले व आजपर्यंत येत आहेत ते असे अनेकजण आमदार, जिल्हा परिषद अध्यक्ष, सदस्य, त्याचबरोबर पंचायत समिती, सरपंच झालेले आहेत. याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे, येणाऱ्या काळामध्ये निवडणुका लागतील त्यामुळे सर्व बांधवांनी एकत्रित आले पाहिजे व आपला योग्य उमेदवार निवडून दिला पाहिजे. संजय केंगार हे खूप प्रामाणिक आणि दलितांसाठी कायम काम करणार आहेत, त्यांच्यासोबत राहा व अन्यायाविरुद्ध होणारा लढा द्या, असे यावेळी त्यांनी सांगितले.

येणाऱ्या पुढील काळामध्ये आपण दुसऱ्या पर्वाला सुरू करणार आहोत आणि आज हळळी या गावापासून त्याची सुरुवात करत आहे, असेही त्यावेळी त्यांनी बोलले. चांगले काम करत राहा संजय यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा ही त्यांनी याप्रसंगी दिले कार्यक्रमाचे सुत्रसंचालन त्याला यलगोंडा कवडे यांनी केले तर आभार रवी कवडे यांनी मानले.

## पक्षाच्या बांधणीसाठी 'संभाजी ब्रिगेड'ची सांगलीत बैठक : जिल्हाध्यक्ष युवराज शिंदे



**सांगली : हॅलो प्रभात**

संभाजी ब्रिगेड प्रदेशाध्यक्ष ड. मनोजराव आखरे-पाटील यांच्या अधिकृत पक्षादेशानुसार संभाजी ब्रिगेड पुनर्गठन आणि पक्ष सक्षमीकरण मोहिमेअंतर्गत पक्ष निरीक्षक व राज्य संघटक दिनेश जगदाळे, किरण घाडगे, सुयोग औंधकर यांचा दौरा निश्चित झाला असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीत संभाजी ब्रिगेड पार्टीचे अधिकृत उमेदवार भरघोस मतांनी निवडून येतील व जनसामान्यांचे मुलभूत प्रश्न, अग्रक्रमाने सोडवतील यासाठीच सक्षम विभागीय पदाधिकाऱ्यांसह जिल्हाध्यक्ष, महानगराध्यक्ष, तालुकाध्यक्ष, शहराध्यक्ष, समवेत ईतर आघाड्यांचे पदाधिकारी निवडीसाठी शनिवारी सकाळी दहा वाजता बैठक आयोजित केली आहे.

संभाजी ब्रिगेड पक्ष निरीक्षक इच्छुक उमेदवारांकडून अर्ज स्वीकारतील तसेच संबंधिताच्या मुलाखतीही घेतील. तरी सांगली जिल्ह्यातील संभाजी ब्रिगेड विभागीय, जिल्हा पदाधिकारी, तालुकाध्यक्ष व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, तसेच इच्छुकांनी आपण कोणत्या पदावर सध्या कार्यरत आहात. त्या कार्यक्षेत्रातील पदाधिकाऱ्यांच्या नावांच्या संपर्क क्रमांकासहीत याद्या लिखित स्वरूपात आणि विहीत नमुन्यातील अर्ज व अहवाल सादर करावा, अशी माहिती जिल्हाध्यक्ष युवराज शिंदे यांनी दिली.

# तनपुरे यांचे जिल्ह्याच्या विकासात मोठे योगदान : भाऊ पाटील-नवले

**राहुरी : हॅलो प्रभात**

डॉ. दादासाहेब तनपुरे यांचे केवळ तालुक्याच्या नव्हे तर जिल्ह्याच्या विकासात महत्त्वपूर्ण योगदान राहिलेले आहे, असे प्रतिपादन अकोला येथील जनलक्ष्मी पत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भाऊ पाटील- नवले यांनी केले. गुहा येथील प्रेरणापत व मल्टिस्टेट च्या वतीने डॉ. दादासाहेब तनपुरे यांच्या पुण्यतिथी निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुरेश वाबळे अध्यक्षस्थानी होते.

भाऊ पाटील नवले पुढे म्हणाले की, डॉ. दादासाहेब तनपुरे यांनी राहुरी सहकारी साखर कारखाना उभा केला. त्याचबरोबर जिल्ह्यातील अन्य साखर कारखान्यांच्या उभारणीतही त्यांनी मार्गदर्शन केले. मुळा प्रवरा वीज सहकारी संस्था स्थापन करून आशिया खंडातील पहिला प्रयोग यशस्वी केला .

मुळा धरणाच्या निर्मितीतून राहुरीच नव्हे तर जिल्ह्यात जिरायती भागाला पाणी मिळाले.



त्यामुळे शेती समृद्ध झाली. व राहुरी येथे कृषी विद्यापीठ स्थापनात्यांच्या विकासाच्या कामामुळे आजही त्यांची कार्य प्रेरणादायी आहे. तनपुरे सहकारी साखर कारखान्याशी संलग्न शिक्षण संस्था उभारल्या. त्यामुळे शिक्षणाची गंगा तालुक्यात खेड्यापाड्यात पोहोचली.

यावेळी डॉ. दादासाहेब तनपुरे यांच्या प्रतिमेस उपस्थित मान्यवरांनी अभिवादन केले. जनलक्ष्मी पतसंस्था संचालक कैलास शेळके, राहुरी तालुका ट्रक ट्रान्सपोर्टचे मा. चेअरमन आप्पासाहेब कोहकडे, संचालक ज्ञानदेव हारदे व सभासद, कर्मचारी वृंद यावेळी उपस्थित होते. आभार प्रेरणा मल्टिस्टेट व्हा. चेअरमन प्रा. वेणुनाथ लांबे यांनी मानले.

## छत्रपती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांचा मनसेच्यावतीने सत्कार

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

छत्रपती शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कोल्हापूर मनसेच्या कार्यकर्त्यांतर्फे वृक्षारोपण करून कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांना चाफ्याचे झाड देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

शिवाजी विद्यापीठात वृक्षारोपण करण्यात आले.तसेच मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी वाढदिवसाच्या निमित्ताने वृक्षारोपण करून सामाजिक बांधिलकी जपली.तसेच कुलगुरू यांचे जीवन फुलासारखं बहरत राहण्यासाठी चाफा झाडं देऊन दिर्घायुष्य शुभेच्छा दिल्या.यावेळी युवा सेनेचे जिल्हा अध्यक्ष अभिजित राऊत, मनसे युवा शहर अध्यक्ष अजिंक्य शिंदे, आदींसह पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



## आदर्श अभियांत्रिकीच्या ९० विद्यार्थ्यांची निवड

**विटा : हॅलो प्रभात**

लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्ट संचालित आदर्श औद्योगिक प्रशिक्षण संस्था (विटा) येथे यझाकी इंडिया प्रा. लि. पुणे कंपनीचा नोकरी मेळावा झाला.

संस्थेतील व इतर शासकीय आयटीआयमधील जवळपास १४० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. त्यापैकी ९० विद्यार्थ्यांची निवड करून कंपनीने नियुक्ती पत्र दिले आहे. आदर्श आयटीआयचे प्राचार्य व्ही. एम. शिंदे, ट्रेनिंग प्लेसमेंट विभागाचे प्रमुख प्रा. डी. के. जाधव, सदस्य प्रा. एस. एम. खिलारी यांच्या मार्गदर्शनाखाली नोकरी मेळावा आयोजित केला होता. विद्यार्थ्यांना उत्तम संधी उपलब्ध झाली आणि त्यांनी ही संधी यशस्वीपणे साध्य केली. या मेळाव्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्रात करिअर करण्याची संधी मिळाली.

आदर्श आयटीआय नेहमीच विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर आणि रोजगार संधीवर भर देते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे आणि आयटीआयच्या टीमचे संस्थेचे संस्थापक माजी आमदार ॲड. सदाशिवराव पाटील, संस्थेचे अध्यक्ष ॲड. वैभव पाटील यांनी कौतुक करून भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यकारी संचालक पी. टी. पाटील, रविराज सूर्यवंशी, संचालक पूजा पाटील यांनी टीमचे अभिनंदन करून पुढील काळात अशा नामांकित कंपनीत आदर्शचे व परिसरातील विद्यार्थी जावेत, यासाठी प्रयत्नशील राहावे, असे मत व्यक्त केले.

यावेळी महेश जाधव, सुमित चिंचलकर उपस्थित होते. प्रा. जे. ए. जाधव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. व्ही. एम. शिंदे यांनी आभार मानले.

# थोडक्यात महत्त्वाचे

## कॉईनडीसीएक्सच्या स्पॉट ट्रेडिंगमध्ये ३२ टक्क्यांची वाढ

**मुंबई : हॅलो प्रभात**

कॉईनडीसीएक्स या भारताच्या सर्वात मोठ्या क्रिप्टो एक्स्चेंजने आपला मे २०२५ पारदर्शकता अहवाल प्रदर्शित केला आहे आणि त्या मार्फत एक सुरक्षित आणि पारदर्शक क्रिप्टो गुंतवणूक आणि ट्रेडिंग ईकोसिस्टमच्या उभारणीबाबतची आपली वचनबद्धता आणखी दृढ केली आहे. कॉईनडीसीएक्सने स्पॉट ट्रेडिंगच्या प्रमाणात ३२% वृद्धी नोंदवली आहे. एप्रिलमध्ये ३७४ मिलियन डॉलर वरून मे महिन्यात ते ४९२ मिलियन डॉलरवर पोहोचले आहे. ही तीव्र रिकव्हरी यूझर्समधील वाढता आत्मविश्वास आणि कॉईनडीसीएक्सच्या निरंतर प्लॅटफॉर्म संवर्धनाबाबत बाजारपेठेची सकारात्मक प्रतिक्रिया दर्शवते.

## डाबरने आपली कटिबद्धता केली अधिक दृढ

**मुंबई : हॅलो प्रभात**

भारतातील आघाडीची आयुर्वेदिक आणि नैसर्गिक आरोग्य देखभाल व एफएमसीजी कंपनी, डाबर इंडिया लिमिटेडने जनरल ट्रेड स्टॉकिस्ट्स हे आपल्या वितरण इकोसिस्टिमचा खरा आधारस्तंभ असल्याचे सांगून त्यांच्याप्रती आपली अढळ कटिबद्धता अधिक दृढ केली आहे. डाबर इंडिया लिमिटेडचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर, श्री मोहित मल्होत्रा आणि ऑल-इंडिया कन्ज्युमर प्रॉडक्ट्स डिस्ट्रिब्युशन फेडरेशन (एआयसीपीडीएफ) यांच्या दरम्यान मुंबईमध्ये पार पडलेल्या बैठकीमध्ये कंपनीने आपल्या कटिबध्दतेचा पुनरुच्चार केला. यावेळी दोन्ही पक्षांनी बाजारपेठांचे बदलते स्वरूप आणि नवनवीन संधींचा लाभ घेण्यासाठी धोरणे याविषयी आपापले विचार मांडले.

## 'आय-केअर मान्सून सर्व्हिस कॅम्प'चे आयोजन

**मुंबई : हॅलो प्रभात**

इसुझूची सेवा आणि ओनरशिपचा अनुभव उत्कृष्ट ठेवण्याच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा भाग म्हणून, इसुझू मोटर्स इंडिया देशभरात 'इसुझू आय-केअर मान्सून कॅम्प'चे आयोजन करणार आहे. इसुझू डी-मॅक्स पिकअप्स आणि एसयूव्ही श्रेणीसाठी असलेल्या या कॅम्पद्वारे, ग्राहकांना आकर्षक लाभ तसेच प्रतिबंधात्मक देखभाल तपासणी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, जेणेकरून देशभरात या पावसाळ्यात विना-अडथळा ड्रायव्हिंगचा अनुभव मिळेल. 'इसुझू केअर' या उपक्रमाअंतर्गत हा मान्सून कॅम्प १६ ते २१ जून २०२५ या कालावधीत (दोन्ही दिवस धरून) सर्व इसुझू अधिकृत डीलर सेवा केंद्रांमध्ये आयोजित करण्यात येणार आहे. या कालावधीत ग्राहकांना त्यांच्या वाहनांसाठी खास ऑफर्स आणि फायदे मिळू शकतील.

## हॅबिल्डचा 'हर घर योग' उपक्रम

**मुंबई : हॅलो प्रभात**

हॅबिल्ड या भारतातील पहिल्या हॅबिट बिल्डिंग प्लॅटफॉर्मने आपला नवीन उपक्रम 'हर घर योग'च्या शुभारंभाची घोषणा केली आहे. 'योग फॉर वन अर्थ, वन हेल्थ' थीम असलेल्या आंतरराष्ट्रीय योग दिन २०२५ पूर्वी सुरू करण्यात आलेला हा उपक्रम सर्वांगीण आरोग्यासाठी जागतिक आवाहनाशी संलग्न आहे. १०० हून अधिक देशांमध्ये १ कोटीहून अधिक सहभागींचा विस्तृत समुदाय असण्यासह हॅबिल्डचा आता प्रत्येक घरामध्ये योगाची क्षमता आणण्याचा मनसुबा आहे. आयआयटीचे माजी विद्यार्थी, सरकार प्रमाणित योग तज्ञ आणि हॅबिल्डचे सह-संस्थापक सौरभ बोथरा यांच्या नेतृत्वांतर्गत हा उपक्रम समान जागतिक सराव म्हणून सातत्यता, उपलब्धता आणि आरोग्याच्या संकल्पनेला चालना देतो. 'हर घर योग' उपक्रमाची मोठ्या प्रमाणात डिजिटल-फर्स्ट आऊटरिच म्हणून संकल्पना मांडण्यात आली आहे, ज्यामध्ये उद्देश आणि कार्यक्षमतेचे संयोजन आहे.

## पेठमधील श्री व्यंकटेश्वरा विज्ञान महाविद्यालयाचे घवघवीत यश

**पेठ : हॅलो प्रभात**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये शिवाजी विद्यापीठा अंतर्गत घेण्यात आलेल्या बीएस्सी भाग तीनच्या परीक्षेत पेठनाका (ता.वाळवा) येथील श्री व्यंकटेश्वरा विज्ञान महाविद्यालयाचा निकाल ९६.००% लागला असून महाविद्यालयाने निकालाची यशस्वी परंपरा कायम राखत उत्तुंग यश संपादन केले.शिवाजी विद्यापीठाकडून मार्च/एप्रिल मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत श्री व्यंकटेश्वरा विज्ञान महाविद्यालयाचा निकाल पुढीलप्रमाणे - बीएस्सी कॉम्प्युटर सायन्स विभागांमध्ये कु. स्नेहल अनिल कुरणे ८७.००% गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला,कु. संध्या संजय रेडेकर ८४. ७५% गुण मिळवून व्दितीय व कु.धनश्री धनाजी सुतार ८४.२५% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकवला.

तसेच बीएस्सी रसायनशास्त्र विभागात कु.ऐश्वर्या आनंदराव पाटील ८२.२५% गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला,कु. सायली युवराज पाटील ७४.०१% गुण मिळवून व्दितीय व कु.दिव्या मानसिंग पाटील ७२.२५% गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकवला.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांच्या घवघवीत यशाबद्दल संस्थेच्या वतीने अभिनंदन करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.समीर नदाफ,रसायनशास्त्र विभागाप्रमुख प्रा.शिल्पा भोसले,

कॉम्प्युटर सायन्स विभागाप्रमुख प्रा. पुजा साळुंखे व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# डोळ्यांवरील उपचाराच्या संशोधनाला आंतरराष्ट्रीय पुरस्कार



**पुणे : हॅलो प्रभात**
लसीक ही एक प्रचलित शस्त्रक्रिया आहे, ज्यामध्ये लेसरच्या साहाय्याने कॉर्नियापातळकरून दृष्टिदोष दुरुस्त केला जातो. मात्र, कॉर्निया खूप पातळ असणे, केरॅटोकोनस अथवा डोळ्यात कोरडेपणा (ड्राय आय) असणे अशा कारणांमुळे अनेक रुग्णांना ही शस्त्रक्रिया करता येत नाही आणि ते निराश होतात. मात्र,प्रतिष्ठेच्या एशिया-पॅसिफिक अकॅडमी ऑफ ऑप्थाल्मोलॉजी च्या वार्षिक परिषदेत पुण्यातील एशियन आय हॉस्पिटलच्या संशोधनाला यश मिळाले. त्यांनी केलेल्या संशोधनाला बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड मिळाला आहे. या संशोधनात लसीक शस्त्रक्रियेस अपात्र ठरलेल्या ३६१ रुग्णांवर यशस्वी रिफ्रॅक्टिव सर्जरी करण्यात आली, ज्यामुळे पुणे जागतिक नेत्रवैद्यकीय नकाशावर अधोरेखित झाले आहे.

## ■ संमिश्र ■

## स्वच्छ व सुंदर शाळा उपक्रमात भारतमाता विद्यालय द्वितीय




**चिकुर्डे : हॅलो प्रभात**
संत सोपानकाका सहकारी बँक व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ सासवड या संस्थांचे संस्थापक सहकाररत्न स्व. चंदुकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्त, पुरंदरचे माजी आमदार संजय जगताप यांच्या संकल्पनेतून संत सोपानकाका स्वच्छ व सुंदर शाळा हा उपक्रम राज्यात राबवून विभाग व जिल्हास्तरावरील शाळांची पाहणी करून आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण व गुणवत्ता इत्यादी भौतिक बाबींची पाहणी केली.या उपक्रमामध्ये भारतमाता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांक मिळवला आहे.सासवड येथे झालेल्या भव्य सोहळ्यात शिक्षक आमदार जयवंत आसगावकर, माजी आमदार संजय जगताप यांच्या शुभ हस्ते शाळेचे मुख्याध्यापक दादासो सरगर, पर्यवेक्षक विश्वास पाटील, लिपीक जयदीप पाटील यांनी भव्य चषक, मानपत्र, रोख सात हजार रुपये स्वीकारले.

भारतमाता विद्यालय चिकुर्डे शाळा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करते तसेच कला, क्रीडा, व सांस्कृतिक क्षेत्रात अग्रस्थानी आहे.निसर्गरम्य परिसरात असणाऱ्या या शाळेने जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक पटकावून वाळवा तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. शाळेच्या यशाबदल नवभारत शिक्षण मंडळ संस्थेचे संचालक गौतम पाटील,उपसंचालक बी.आर. थोरात, डी.एस. माने यांनी कौतुक करत भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## स्व.निकाळजे यांच्या पुण्यतिथीनिमित्त पेशंटना फळे वाटप



**कोल्हापूर : हॅलो प्रभात**
स्व.रामभाऊ निकाळजे यांच्या २६ व्या पुण्यतिथीनिमित्त कोल्हापूर येथेल सरकारी हॉस्पिटलमध्ये उपचार घेणाऱ्या गरजू पेशंटना फळे बिस्किटे व पाणी बॉटल वाटप करण्यात आले. यावेळी सी.पी.आर चे अधिकारी मगदूम व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे युवक आघाडीचे कोल्हापूर जिल्हा अध्यक्ष अविनाश शिंदे यांच्या हस्ते फळ वाटप करण्यात आले. यावेळी कोल्हापूर शहराध्यक्ष किरण निकाळजे,अमित कांबळे, अशोक गाडे, आकाश मधाळे, रवी खेडकर, अभिजीत,गौतम, सरोदे, पियुष, क्षीरसागर, यशराज निकाळजे उपस्थित होते.

## सद्गुरु श्री.श्री.कारखान्यावरती श्री गुरु पूजेची परंपरा कायम

**पिलीव : रघुनाथ देवकर**
सांगली, सातारा, सोलापूर जिल्ह्याच्या सर्व हद्दीवरील व सर्व शेतकरी ऊस उत्पादक कामगार कर्मचारी यांचे हित जोपासणारा आणि जगाला जीवन जगण्याची कला देणाऱ्या सद्गुरु श्री .श्री .रविशंकरजी तथा गुरुजी यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सद्गुरु श्री .श्री. साखर कारखाना लि. श्री. श्रीनगर (राजेवाडी) या ठिकाणी सर्व संचालक मंडळाच्या प्रेरणेने दर गुरुवारी गुरु पूजेचे आयोजन करून ती परंपरा जोपासली जात आहे. कारखाना चेअरमन इमारतीमध्ये सद्गुरु श्री. श्री. रविशंकरजी यांची प्रतिमा ठेवून चेअरमन एन शेषागिरी राव यांच्या उपस्थितीमध्ये संचालिका व दि आर्ट ऑफ लिविंगच्या टीचर सौ. उषाताई मार्कड, आर्ट ऑफ लिविंगचे टीचर श्री.वनवे तसेच जयश्री नरळे यांनी गुरु पूजेचे आयोजन केले. यावेळी असंख्य साधकांनी सद्गुरु श्री श्री रविशंकरजी तथा गुरुजी यांचे व गुरु पूजेचे दर्शन घेतले. या गुरु पूजेमुळे कारखाना साईटवर व सर्वच स्टाफ यांच्यामध्ये उल्हासित वातावरण दिसून आले.

## मांसाहारी पदार्थ विक्रेत्यांना स्वतंत्र झोनमध्ये स्थलांतरित करा ; नागरिक मंचची मागणी



**इचलकरंजी : हॅलो प्रभात**
शहरात दिवसेंदिवस भटक्या कुत्र्यांचा त्रास गंभीर बनत असून मांसाहारी पदार्थ उघड्यावर विक्री करणाऱ्यांमुळे कुत्र्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे अशा विक्रेत्यांना शहरात स्वतंत्र झोनमध्ये स्थलांतरित करावे आणि त्यांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी इचलकरंजी नागरिक मंचने केली आहे. मंचच्या शिष्टमंडळाने याबाबतचे निवेदन उपयुक्त नंदू परळकर यांना दिले.

शहरात सुमारे ४०० मांसाहारी पदार्थ विक्रेते उघड्यावर व्यवसाय करत आहेत. चिकन ६५, बिर्याणी यासारख्या पदार्थांची उघड्यावर विक्री होत असल्याने संबंधित भागात कुत्र्यांचा वावर वाढतो आणि ते आक्रमक होऊन नागरिकांवर हल्ले करण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी मांसाहारी पदार्थ विक्रीसाठी स्वतंत्र झोनची आवश्यकता असल्याचे निवेदनात नमुद केले आहे. यावेळी उपयुक्त परळकर यांनी हा विषय नगरपथविक्रेता समितीच्या पुढील बैठकीत मांडून योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. शिष्टमंडळात राजू पारीक, राजू कोंन्नुर, महेंद्र जाधव, अमोल मोरे, अभिजित पटवा यांचा समावेश होता.

# घरात पाणी शिरले, रस्ते झाले नद्या - जबाबदार कोण?






**कोल्हापूर : हॅलो प्रभात**
कोल्हापूर शहराने मान्सूनच्या सुरुवातीलाच मोठा तडाखा सोसला आहे. अवघ्या दोन-तीन दिवसांच्या जोरदार पावसामुळे शहरातील अनेक भाग जलमय झाले असून, सखल भागातील घरांमध्ये पाणी घुसल्याने नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली आहे. भरलेले नाले, तुंबलेली गटारे, आणि रस्त्यांवरून वाहणारे पाण्याचे लोंढे यामुळे संपूर्ण शहराची वाहतूक व्यवस्था विस्कळीत झाली आहे.शहरात विविध ठिकाणी साचलेल्या पाण्यामुळे घरगुती साहित्याचे नुकसान, छोटे व्यवसाय ठप्प होणे आणि आरोग्य धोक्यात येण्याच्या परिस्थितीमुळे नागरिक त्रस्त झाले आहेत. विशेषतः गगनबावडा रोड, टेंबलाई परिसर, शाहूपुरी, उचगाव पेठ, पापाची टाकी परिसरातील रहिवाशांना घरातच जलप्रलयाचा सामना करावा लागला.

या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने प्रशासन आणि लोकप्रतिनिधींवर थेट आरोप करण्यात आला आहे. पक्षाचे उपनेते संजय पवार व सहसंपर्कप्रमुख विजय देवणे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महापालिकेच्या अनियोजित आणि अंवडेल रस्ते विकास प्रकल्पांमुळे नागरिकांच्या घरात पाणी शिरले आहे.

ते पुढे म्हणाले, अनावश्यकपणे वाढवलेली रस्त्यांची उंची आणि योग्य निचऱ्याच्या अभावामुळे साचलेले पाणी नागरिकांच्या घरात आणि दुकानांत शिरत आहे. महापालिकेने वेळेत नालेसफाई आणि गटारींची दुरुस्ती केली असती, तर ही परिस्थिती टाळता आली असती.

शिवसेनेने निवेदनातून इशारा दिला आहे की, जर तातडीने गटारींची स्वच्छता, नाल्यांचा निचरा, आणि रस्त्यांखालच्या घरांची रचना समप्रमाणात करा,अन्यथा महापालिकेसमोर शिवसेना शंखध्वनी आंदोलन छेडेल. अशा परिस्थितीमुळे कोल्हापूरकरांमध्ये संतापाचे वातावरण आहे. दरवर्षी पावसाळ्यात अशीच स्थिती निर्माण होते, मात्र प्रशासनाकडून तात्पुरते उपाय करून प्रश्नांचे मूळ समजून घेण्याचे किंवा कायमस्वरूपी तोडगा काढण्याचे प्रयत्न होताना दिसत नाहीत, अशी नागरिकांची भावना आहे.

## ओबीसी व अनुसूचित जातीच्या योजनांना विशेष निधी द्या : संदेश भंडारे

**सांगली : हॅलो प्रभात**
सांगली जिल्ह्यातील समाजकल्याण विभागाच्या कल्याणकारी योजनांना विशेष निधी देऊन घरकुल, संविधान भवन, युवा बचत गट व बेरोजगार युवकांचे उद्योगाना गतिमान करण्यासाठी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाचे लोकसभा जिल्हाध्यक्ष संदेशभाऊ भंडारे यांनी समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मेघराज भाते यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

सांगली येथील कार्यालयात बैठकीत पलूस कडेगाव रिपाई विधानसभा अध्यक्ष विशाल तिरमरे, खानापूर आटपाडी विधानसभा अध्यक्ष तथा जिल्हा उपाध्यक्ष दादासाहेब चंदनशिवे,भिमशक्तीचे जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ माने, कामगार आघाडी जिल्हाध्यक्ष संजय मस्के, युवक जिल्हा उपाध्यक्ष निलेश गवाळे आदी उपस्थित होते.

समाज कल्याण सहाय्यक आयुक्त मेघराज भाते यांची भेट घेऊन जिल्ह्यातील रमाई घरकुल योजना, ओबीसी, अनुसूचित जाती जमाती आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील गरीब विध्यार्थी, स्कॉलरशिप योजना याबाबत चर्चा करण्यात आली.

रिपाईचे लोकसभा जिल्हाध्यक्ष संदेशभाऊ भंडारे यांनी जातपडताळणी बाबत च्या अडचणी सांगून विविध समस्यांचे पाढे वाचले. तसेच युवा बचत गटांच्या माध्यमातून उद्योग निर्मिती साठी योजना राबवण्याची विनंती केली, बेरोजगार युवकांना सक्षम करण्यासाठी राज्य व केंद्रातील योजना अमलात याव्यात यासाठी प्रयत्न व्हावेत अशी मागणी केली.

रमाई घरकुल योजनेच्या रक्कमेत वाढ करण्यात यावी. वयोश्री योजना लाभार्थ्यांची अर्ज कार्यालयात प्राप्त झाले आहेत त्या लाभार्थ्यांना लाभ तात्काळ सुरू करण्यात यावा. जिल्हास्तरावर राबवण्यात येत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेची अंमलबजावणी तालुकास्तरावर राबविण्यात यावेत.

वस्तीग्रह व निवासी शाळा यांचा चांगला दर्जा वाढवण्यासाठी सांगली समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय यांनी विशेष लक्ष देऊन कार्यवाही करावी. -डॉ. बाासाहेब आंबेडकर विशेष अनुदान योजनेअंतर्गत सुशिक्षित बेरोजगार तरुणांसाठी विविध प्रशिक्षण तालुका निहाय राबविण्यात यावेत. ज्या गावांमध्ये समाज मंदिर बांधण्यात आले नाहीत किंवा खूप जुने झाले आहेत त्या ठिकाणी समाज मंदिर बांधून त्या ठिकाणी अभ्यासिका व वाचनालय यासारखे उपक्रम राबविण्यात यावेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी. मिनी ट्रॅक्टर योजना निपक्षपातीपणे राबवून गरजू व खऱ्या लाभार्थ्यांना सदरच्या योजनेचा लाभ देण्यात यावा.

अशा विविध मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या. यावेळी युवा उद्योजक सिद्धार्थ कांबळे, सरचिटणीस प्रविण मोरे उपस्थित होते.

## क्रांतिसिंह नाना पाटील वस्तीगृहास पुरस्कार

### वस्तीगृहाची वाटचाल जी.डी.बापू लाड यांच्या स्वप्नपूर्तीच्या दिशेने


**देवराष्ट्रे : संदेश जाधव**
कुंडल (ता.पलूस) येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी.डी. बापू लाड यांनी गोरगरीब व निराधार मुलांच्या शिक्षणासाठी स्थापन केलेल्या क्रांतिसिंह नाना पाटील विद्यार्थी वस्तीगृहास महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सामाजिक न्याय कल्याण मंत्री संजय शिरसाट, वस्त्र उद्योग मंत्री भरत शेठ गोगावले, जलसंपदा मंत्री संजय राठोड या मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. प्रमाणपत्र, चषक, तसेच एक लाख रुपये रोख असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुणे पदवीधर मतदार संघाचे आ.अरुण लाड, संस्थेचे कार्याध्यक्ष किरण लाड, क्रांती कारखान्याचे चेअरमन शरद लाड, प्रकाशभाऊ लाड यांच्या मार्गदर्शनाखाली वस्तीगृहाचे कामकाज अत्यंत उत्कृष्ट पद्धतीने चालू आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय प्राविण्य पुरस्कार वस्तीगृहास मिळाल्यामुळे वस्तीग्रहाची वाटचाल डॉ.जी डी बापू यांच्या स्वप्नपूर्तीकडे जात असल्याचे सर्वसामान्य लोकांमधून बोलले जात आहे. पुरस्कार स्वीकारण्यासाठी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य कुंडलिक एडके, मुकुंद जोशी, अरुण सावंत,संजय मदने, विलास लाड, रामचंद्र लाड,मोहन पुजारी, हणमंत बंडगर, महेश मोरे, संजय गोरड इत्यादी उपस्थित होते.

## आधारवड शैक्षणिक कार्याचा : मा. गुरुवर्य प्राचार्य आर.एस.चोपडे

**दै. हॅलो प्रभात**
गुरुवर्य चोपडे सरांनी सन १९७१ साली आदरणीय बॅरिस्टर टी के शेंडगे साहेब यांना आपले दैवत व प्रेरणास्थान मानून वयाच्या २१व्या वर्षापासून आपल्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्याला सुरुवात केली ते ३५ वर्ष प्रयोगशील व यशस्वी मुख्याध्यापक तेरा वर्षे कार्य कुशल सचिव व गेली १८ वर्ष संस्थेचे एक कर्तृत्ववान अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत.

त्यांचा जीवन प्रवास एक इतिहास आहे संस्थेने त्यांच्या कार्यपद्धती, महत्वकांक्षा ,चिकाटी, दूरदृष्टी ,समाजशीलता, संघटन कौशल्य, अभ्यासुवृत्ती, नेतृत्व हे सुरुवातीला गुण ओळखून संस्थेच्या सिद्धांतानुसार बहुजनांच्या मुलांच्या शिक्षण विकास आणि शिक्षण प्रसार कार्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली.

त्यांनी आपल्या ज्येष्ठ व समवयस्कर सहकार यांच्या सहकार्याने कार्याचा डोंगर उभा केला सांगली सातारा व सोलापूर जिल्ह्यातील अत्यंत दुर्गम व ग्रामीण भागात संस्थेची १४ माध्यमिक विद्यालय सहा कनिष्ठ महाविद्यालय एक महाविद्यालय पाच प्राथमिक शाळा आणि चार वस्तीग्रह इतका शिक्षण विस्तार केला असून त्या सर्व शाखा त्या त्या परिसरातील परिवर्तनशील व गुणवत्तापूर्ण शैक्षणिक केंद्र आहेत याच पद्धतीची नर्सरी ते दहावीपर्यंतची सीबीएससी स्कूल सांगलीमध्ये कार्यरत आहे पालक ग्रामस्थ यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास या मूलतत्त्वावर आधारित अनुभव सिद्धी निर्मिती करून संस्था अंतर्गत पातळीवर प्रभावी अंमलबजावणी केली आहे सेवकांच्या आर्थिक अडचणी तात्काळ निवारण्यासाठी व सामाजिक उपयुक्त साठी सेवकांची मर्यादित पतसंस्था स्थापन करण्यात आली.



संस्थेचे संचालक हे संस्थेचे अनुभवी व समर्पित भावनेने संस्थेचा प्रचार प्रसार व गुणवत्तावर्धक विकास करणाऱ्या महत्वकांक्षा अध्यापकांमधूनच घेतले जातात व शाखा निहाय प्रतिनिधित्व दिले गेले संस्थेक सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील थोर विभूतींचा स्नेह आणि जवळीकता निर्माण होऊन ती सातत्याने वृद्धीत होत आहे.

**अमृत महोत्सवी सोहळा विशेष**
**१५ जून २०२५**
**स्थळ : धनंजय गार्डन,सांगली.**

संस्थेत जा पुष्कळशी माजी विद्यार्थी विविध क्षेत्रात दैदीक दैदिप्यमान कामगिरी करून चमकत आहेत त्यांना सातत्याने निमंत्रित करून माजी विद्यार्थी स्नेह मेळावा घेतले जातात सर्वात अत्यंत महत्त्वाचे म्हणजे बहुजन समाजातून आलेला संस्थेचा संपूर्ण सेवक वर्ग संस्थेच्या कार्या क्षेत्रातील किंवा माजी विद्यार्थ्यांमधूनच घेतला आहे.

एक एखादे समारंभ घटना पुण्यस्मरण उत्सव मेळावी येत्या इत्यादी एक समाजभान व ऋण इतिहास कृतज्ञता यासह भविष्यातील उत्कर्षासाठी ऊर्जा व अंगभूत कलागुणांना वाव मिळावा या हेतूने सतत साजरे केले जातात.

क्रांतिवीर नागनाथ अण्णा नायकवडी यांच्या १३ दुष्काळी तालुक्याच्या पाणी चळवळी त्याचप्रमाणे विद्रोही चळवळीमध्ये सरांचा सहभाग हा समाजाप्रती असलेले कृतज्ञ भाव दर्शवतो. अलीकडेच सद्गुरु वामनराव पै यांच्या वैज्ञानिष्ठ तर्कसुसंगत व उत्कर्षमय सुखी जीवनात गवासणी घालणारे विचारसरणी संस्थेने डोळसपणाने अंगीकारले आहे. या सर्व निर्मितीमागे संस्थेस लाभलेले आदरणीय गुरुवर्य प्राचार्य चोपडे सर यांचे संघटन कौशल्य त्याचबरोबर त्यांचे प्रभावी खंबीर व समाज बुक भिमुख असे नेतृत्व आहे आज संस्थेने शिक्षण क्षेत्रामध्ये आपली एक आगळी वेगळी ओळख निर्माण केली आहे.

शासन दरबारी समाजाने आदरणीय चोपडे सरांच्या कार्याची दखल घेतलेली असून त्यांना आदर्श शिक्षक राज्य पुरस्कारासह अनेक सामाजिक शैक्षणिक संस्थांनी पुरस्कृत करून गौरवलेले आहे. असे आमचे गुरुवर्य खरोखर शिक्षणाचा आधारवड आहेत.

**शब्दांकन : प्रविण कुमार स्वामी**
**संचालक**
**अहिल्या शिक्षण संस्था, सांगली**

➔ **संकलन : लुनेश विरकर (म्हसवड)**

## जलसंपदा विभागाच्या मागण्यांबाबत आ.डॉ.खाडे यांची ना.विखे-पाटील यांच्याशी चर्चा

### पुरेसा निधी उपलब्ध करून देऊ : ना.विखे-पाटील



**सांगली : हॅलो प्रभात**
राज्याचे जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याशी सांगली जिल्ह्याचे माजी पालकमंत्री व मिरजेचे विद्यमान आमदार डॉ.सुरेशभाऊ खाडे यांनी मतदारसंघातील जलसंपदा विभागाशी निगडित विविध मागण्यांबाबत सविस्तर चर्चा करून या मागण्या मान्य करण्याची व यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याची विनंती केली.

यावेळी जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देऊन लवकरच या कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देऊन कामांना मंजुरी देण्यात येईल आश्वासन दिले. राज्याचे जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील बुधवारी सांगली जिल्ह्याच्या दौऱ्यावर होते. यावेळी आ. डॉ. सुरेशभाऊ खाडे यांनी त्यांची भेट घेऊन मतदारसंघातील काही कामे होणे अत्यावश्यक असल्याचे सांगून ही कामे मंजूर करावीत व त्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी केली.

यामध्ये मिरज तालुक्यातील ७ धडक योजनेचे लाभक्षेत्र म्हैसाळ उपसा सिंचन योजनेमध्ये समाविष्ट करून निधी उपलब्ध करून द्यावा याचबरोबर म्हैसाळ योजनेच्या कळंबी शाखा कालव्यावरील मल्लेवाडी ता. मिरज येथे मल्लेवाडी-गुंडेवाडी रस्त्यासाठी पूल बांधकाम करणेसाठी, म्हैसाळ योजनेच्या कळंबी शाखा कालव्यावरील बेडग येथे बेडग-एरंडोली प्र.जि.मा. १०३ रस्त्यासाठी पूल बांधकाम करणेसाठी निधी व म्हैसाळ उपसा सिंचन योजना-मिरज व कवठेमहांकाळ या तालुक्यामधील मौजे कुकटोळी, डोंगरवाडी, खंडेराजुरी, गवळेवाडी, गुंडेवाडी, भोसे, शिंदेवाडी, खरशिंग, अलकूड (एम), बनेवाडी, योगेवाडी व हरोली या गावातील वंचित क्षेत्राचे सर्वेक्षण, संकल्पन व अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता तातडीने मिळावी अशा विविध कामांचा समावेश होता.

या सर्व कामांबाबत ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी सविस्तर चर्चा झाली असून त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने लवकरच या कामना मंजुरी मिळेल तसेच पुरेसा निधी उपलब्ध करून दिला जाईल याची खात्री असल्याचे आ.डॉ. सुरेशभाऊ खाडे यांनी सांगितले.

ऋणनिर्देश



स्व.बळवंत पंडीतराव पाटील
आमच्या कुटूबांचा आधारवड बळवंत पंडीतराव पाटील (वय ७५) यांचे दि.०३ मे रोजी आकस्मित निधन झाले. आमच्यावर ओढावलेल्या दु:खद प्रसंगी राज्यातील राजकीय पक्षाचे नेते, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर,नातेवाईक,भाऊबंद,पै पाहुणे,मित्रमंडळी आदींनी आमच्यावर ओढावलेल्या दु:खद प्रसंगी प्रत्यक्ष,फोनद्वारे,सोशल मीडिया,आदी माध्यमातून दुख:चा भार हलका केलात. या सगळ्यांचे आम्ही क्षतशा ऋणी आहोत.

शोकाकुल
श्री.बाबासाहेब पाटील (आसुर्लेकर)
जिल्हाध्यक्ष : राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी
संचालक : कोल्हापूर जिल्हा बँक
श्री.संपतराव पाटील
बँकेचे माजी विभागीय अधिकारी
श्री.भगवानराव पाटील
माजी लोकनियुक्त सरपंच
श्री.युवराज पाटील
पोलिस निरीक्षक
पाटील बंधू आणि मित्र परिवार
आसुर्ले.ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली, कोल्हापूर, सातारा, सोलापूर, पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ३००० /- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ५००० /- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | ७५०० /- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976